cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-२७४ | रविवार दि.१ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### पुन्हा ऐक्य घडू दिले जाणार नाही !


उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान अपघातात निधनानंतर रक्षा विसर्जन होताच सत्तेचा निर्णय घेण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यावर आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्रीपद त्यांनी शनिवारी स्विकारले. आता राष्ट्रवादीचा सत्तेतील चेहरा सुमित्रा पवार असतील पण,सुत्रे कोण हालविणार असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

# नमो शेतकरीचा हप्ता चालू आठवड्यात ?

## दोन महिन्यांपासून हप्ता रखडल्याने शेतकऱ्यांत संभ्रम

पुणे । प्रतिनिधी

**राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेचा आठव्या हप्त्याच्या प्रतीक्षेत शेतकरी आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यावर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात हप्ता जमा होण्याची शक्यता आहे.**




राज्य शासनाने दोन वर्षांपूर्वी नमो शेतकरी सन्मान योजना घोषित केली. प्रधानमंत्री सन्मान योजनेत पात्र शेतकरीच राज्याकडूनही लाभ घेतात; पण, राज्य शासनाचा ऑगस्ट ते नोव्हेंबरदरम्यानचा हप्ता अजूनही मिळालेला नाही. बहुतांशीवेळा केंद्राबरोबरच राज्य शासनाचाही हप्ता मिळत असतो. मात्र राज्याच्या मदतीला उशीर झालेला आहे. मात्र फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात हा हप्ता मिळणार असल्याचे संकेत शासकिय पातळीवरून मिळत आहेत. शेतकऱ्यांना शेतीसाठी मदत व्हावी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सात वर्षांपूर्वी किसान सन्मान योजना सुरू केली. यामधून शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपयांची मदत दिली जाते. महिन्यापूर्वीच २१ वा हप्ता आला असून, शेतकऱ्यांच्या खात्यावर दोन हजार जमा झाले; पण राज्य शासनाच्या नमो योजनेचा आठवा हप्ता मिळालेला नाही. तसेच नववा हप्ताही मार्चपूर्वी मिळणे महत्त्वाचे आहे. यासाठी लाभार्थी शेतकरकी बँकेत हेलपाटे मारू लागले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी ▶▶ पान २ वर

### राज्याच्या वाढीव तीन हजारांचा निर्णय नाही

राज्य शासनाने विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना केंद्राचे आणि राज्याचे मिळून वर्षाला १५ हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. म्हणजे राज्य शासन वर्षाला जादा ३ हजार रुपये देणार आहे; पण वाढीवमधील तीन हजार रुपये कधी मिळणार? हे अजून तरी गुपितच आहे.

### ई-केवायसी असेल तरच लाभ

राज्य आणि केंद्र शासनाच्या या योजनेसाठी शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण आणि ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय या योजनेचा लाभ मिळत नाही. आधारकार्ड प्रमाणीकरण न करणारे अधिक शेतकरी आहेत. तर ई-केवायसी बऱ्याच शेतकऱ्यांनी केली नाही. त्यामुळे त्यांना हप्ता मिळताना दिसत नाही.

## राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांनी घेतली शपथ

# दादांचा वारसा वहिनींकडे!

मुंबई । प्रतिनिधी

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी शनिवारी उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेतली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. यामुळे सुनेत्रा पवार ह्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री बनल्या आहेत. त्यापुर्वी राष्ट्रवादी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली त्यात विधीमंडळाच्या गटनेतेपदी निवड करून त्यांना पक्षाचे सर्वाधिकार देण्यात आले. यामुळे आता दादांचा वारसा हा अधिकृतपण वहिनींकडे आला आहे.**



लोकभवन येथे झालेल्या या शपथविधीवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ▶▶ पान २ वर

### सुनेत्रा पवार पोटनिवडणूक लढविणार तर पार्थ राज्यसभेवर

राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतलेल्या सुनेत्रा पवार या अजितदादा पवार यांच्या निधनाने बारामतीत होणारी पोट निवडणूक लढविणार आहेत तर राष्ट्रवादीच्या कोट्यातून पार्थ पवार हे राज्यसभेवर जाणार असल्याचे सुत्राकडून समजते. यापुर्वी सुनेत्रा पवार यांनी बारामतीची लोकसभा निवडणूक लढविली असून यात त्यांचा सुप्रिया सुळे यांच्याकडून पराभव झालेला आहे. तर पार्थ पवार यांनी मागच्यावेळी मावळ मधून लोकसभेची निवडणूक लढविली होती, मात्र त्यांचाही पराभव झाला होता.

### सुनेत्रा पवार यांना मोदी यांच्याकडून शुभेच्छा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत सुनेत्रा पवार यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सुनेत्रा पवार राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी अथक परिश्रम करतील, असे ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून कार्यकाळ सुरू करणाऱ्या सुनेत्रा पवारजी यांना शुभेच्छा. मला विश्वास आहे की त्या राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी अथक परिश्रम करतील आणि दिवंगत अजितदादा पवार यांचे स्वप्न पुढे नेतील.

### अर्थखातं मुख्यमंत्र्यांकडे तर सुनेत्रा पवारांकडे राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा आणि अल्पसंख्याक

सुनेत्रा अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर अवघ्या तासाभरात खातेवाटप जाहीर करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थखाते स्वतःकडे ठेवले असून, सुनेत्रा पवारांकडे इतर खात्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा आणि अल्पसंख्याक ही खाती देण्यात आली आहेत. मंत्रिपदाचा राजीनामा दिलेले माणिकराव कोकाटे यांच्याकडील दोन्ही खाती आता सुनेत्रा पवार बघतील.

### शरद पवार, सुप्रिया सुळे अनुपस्थित

शरद पवार यांनी शनिवारी सकाळी पत्रकार परिषद घेऊन सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत याबाबत कोणतीही कल्पना नाही अशी प्रतिक्रिया दिली. या शपथविधीला शरद पवार अनुपस्थित होते. सुप्रिया सुळे यांनी दुपारी काटेवाडीत आशाताई पवार (अजितदादांच्या मातोश्री) यांची भेट घेतली. मी काकूंना भेटायला आले होते. उद्या (रविवारी) केंद्रीय अर्थसंकल्प असल्याने मी इथून दिल्लीला रवाना होणार आहे, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळेंनी दिली. शपथविधीबाबत मला कल्पना नाही, असे सांगत त्यांनी अधिक भाष्य करणे टाळले.

### अजित पवारांप्रमाणेच सुनेत्रा पवार खंबीर वृत्तीच्या

अजित पवारांच्या जाण्याने अवघे पवार कुटुंब कोसळून गेले आहे. त्यांची दोन्ही मुले राजकारणात अजून नवखी असल्याने त्यांना पुढे करण्याचा निर्णय राष्ट्रवादीच्या नेत्यांना घ्यावा लागला आहे. त्यासाठी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपद सांभाळण्यासाठी राजी करण्यात आले. अजित पवारांप्रमाणेच सुनेत्रा पवार या खंबीर वृत्तीच्या आहेत. बारामती मतदारसंघ आणि त्यांच्या संस्थांमध्ये त्या कार्यरत आहेत. तसेच, त्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या भगिनी आहेत. जिल्हा परिषद निवडणुका झाल्यानंतर पुढे लोकसभा निवडणुकीपर्यंत कोणत्याही निवडणुका नसल्या, तरी त्यांना पक्षाची घडी बसवून पक्षाला पुढे नेण्याचे काम करावे लागणार आहे. सोबतच, सरकारमध्येही आपला दबदबा ठेवावा लागणार आहे.

### नव्या आशेने पुढे चालत राहीन-सुनेत्रा पवार

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. दादांच्या अकाली जाण्याने मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला असला, तरी त्यांनी शिकवलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे. त्यांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे काम करत राहीन. या कठीण क्षणी महाराष्ट्रातील जनतेने दिलेली प्रेमाची साथ हेच माझे बळ आहे. आपल्या विश्वासाच्या जोरावर, दादांच्या विचारांना उजाळा देत, नव्या आशेने पुढे चालत राहीन, असे सुनेत्रा पवार यांनी म्हटले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष 'पाटील' असावा 'पटेल' नाही-राज ठाकरे

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादीचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात दुखद निधन झाले. २८ जानेवारी रोजी ही घटना घडली होती. त्यानंतर चौथ्याच दिवशी राज्याच्या राजकारणात प्रचंड घडमोडी घडल्या व अजित पवार यांच्यास पत्नी सुनेत्रा



पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. या घटनांवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कठोर भाषेत टिका केली आहे.

गेले दोन दिवस राष्ट्रवादीचे नेते प्रफूल्ल पटेल व सुनिल तटकरे हे बैठकांवर बैठका घेत आहेत. याचा संदर्भ घेत त्यांनी थेट पटेल यांना लक्ष्य केले आहे. ▶▶ पान २ वर

## १२ फेब्रुवारीला होणार होते विलिणीकरन-जयंत पाटील

पुणे । प्रतिनिधी

शरद पवार यांच्या हयातीत राष्ट्रवादी पक्ष एकत्र करायचा अशी अजितदादांची मनोमन इच्छा होती, मागच्या सहा महिन्यात झालेल्या बैठकीत अजित दादांनी ही गोष्ट बोलून दाखवली होती, शरद पवारांनी



याबाबतची जबाबदारी माझ्याकडे दिली होती. बारामतीला जी सर्व नेत्यांची बैठक झाली त्यासाठी आधी आम्ही विमानाने जाणार होतो, पण बारामतीच्या धावपट्टीवर विमान उतरेल असे विमान मिळाले नाही, असा गौप्यस्फोट शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी केला आहे. विशेष म्हणजे ▶▶ पान २ वर

# विलीनीकरणाच्या मुद्यावर राष्ट्रवादीच्या गटात संभ्रम

## नेत्यांची वेगवेगळी विधाने समोर


मुंबई । प्रतिनिधी

**अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी भरून काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याकडे नेतृत्व सोपवून त्यांना उपमुख्यमंत्रिपदी बसविण्यात आले आहे. तर शरद पवार गटाकडून विलीनीकरणाच्या चर्चेवर भर देण्यात येत आहे. दोन्ही पक्ष एकत्र यावेत, अशी अजित पवारांची इच्छा होती, असे शरद पवार यांनी शनिवारी सकाळीच पत्रकार परिषदेत सांगितले. यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत असून, वलीनीकरणाच्या मुद्यावर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात संभ्रम असल्याचे समोर येत आहे.**




विलीनीकरणाच्या मुद्यावर अजित पवारांच्या राष्ट्रवादीत दोन गट पडले असल्याचे दिसून येते. विलीनीकरणाबाबतचा प्रश्न अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना माध्यमांकडून विचारला गेला. यावर ते म्हणाले, या प्रश्नावर मला काही बोलायचे नाही. विधिमंडळ पक्षाची बैठक मध्ये आम्ही सविस्तर बोलू. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या आमदार आणि नवाब मलिक यांच्या कन्या सना मलिक शेख यांनीही या प्रकरणावर भाष्य केले आहे. त्या म्हणाल्या, आमच्या नेत्यांनी आम्हाला याबाबत काही सांगितले नाही. मागच्या दोन महिन्यांत पक्षातील सर्व नेते निवडणुकीत व्यस्त होते. मात्र माध्यमातून एकत्रीकरणाची चर्चा होत राहिली. तसेच मागच्या दोन दिवसांपासून शरद पवार गटाकडून यासंबंधी विधाने केली जात आहेत. पण अशी काही चर्चा असेल तर आमचे पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पवार कुटुंब एकत्रितपणे याचा विचार करतील. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचे आणखी एक नेते अनिल पाटील यांनीही या मुद्यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, विलीनीकरणाबाबत शरद पवार यांनी जे विधान केले आहे, त्यावर आमच्या पक्षातून ▶▶ पान २ वर

## जा मर म्हणणं म्हणजे जीवन संपविण्यासाठी प्रवृत्त करणे नव्हे



कोची । वृतसंस्था

दोन व्यक्तीच्या भांडणादरम्यान एकाने जा आणि मर यांसारखी अनौपचारिक विधाने करणे हे जीवन संपविण्यास प्रवृत्त करण्याच्या श्रेणीत येत नाही. जीवन संपविण्यास प्रवृत्त करणाऱ्या विधानाचा हेतू महत्त्वाचा आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती सी. प्रदीप कुमार यांच्या एकलपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा हवाला देत संशयित आरोपविरोधात सत्र न्यायालयाचा ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### महायुतीची सोमवारी गट नोंदणी

मुंबईः भाजपा-शिवसेना महायुतीच्या नगरसेवकांची गट नोंदणी सोमवारी २ फेब्रुवारी रोजी केली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या गट नोंदणीमुळे मुंबई महानगरपालिकेची रखडलेली महापौर व उपमहापौर निवडणूक पुढील दहा दिवसांत घेणे पालिका प्रशासनाला शक्य होणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे भाजपा-शिवसेना महायुतीच्या गट नोंदणीची चर्चा थांबली होती. शनिवार व रविवारी चर्चा करून गट नोंदणीचा निर्णय घेण्यात येणार आहे. त्यानुसार सोमवारी कोकण आयुक्तांकडे गटाची नोंदणी करून, याची माहिती त्याच दिवशी मुंबई महापालिका सचिव विभागाला कळवली जाणार आहे. गटाच्या नोंदणीनंतर मुंबई महापालिका सचिव विभागात येऊन प्रत्येक नगरसेवकाला आपल्या वैयक्तिक माहितीचा अर्ज भरावा लागणार आहे.

### भारत आता व्हेनेझुएलाकडून करणार तेल खरेदी

नवी दिल्लीः रशिया-युक्रेन युद्धामुळे बदललेल्या जागतिक समीकरणांच्या पार्श्वभूमीवर भारत आता तेल आयातीचे धोरण बदलण्याच्या तयारीत आहे. रशियावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारताने व्हेनेझुएलाकडून कच्चे तेल खरेदी करावे, असा प्रस्ताव अमेरिकेने दिला असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या निर्णयामुळे अमेरिकेने भारतीय वस्तूंवर लादलेल्या २५ टक्के अतिरिक्त आयात शुल्कातून भारताला दिलासा मिळण्याची शक्यता आहे. भारत येत्या काही महिन्यांत रशियन कच्च्या तेलाची आयात दररोज लाखो बॅरलने कमी करण्याच्या तयारीत आहे. भारत आणि कराकस यांच्यातील राजनैतिक चर्चा सुरू असतानाच अमेरिकेने भारताला व्हेनेझुएलाच्या तेलाचा पर्याय दिला आहे. व्हेनेझुएलाच्या हंगामी अध्यक्षा डेल्सी रॉड्रिग्ज यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली.

### गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी म्हैसकर

मुंबईः महापालिका निवडणुकीची रणधुमाळी पार पडताच राज्य सरकारने ४ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. त्यानुसार गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी मनीषा पाटणकर-म्हैसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी मिलिंद म्हैसकर यांची नेमणूक झाली आहे. ज्येष्ठ सनदी अधिकारी आय. एस. चहल हे नियत वयोमानुसार रविवारी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीने रिक्त होत असलेल्या गृह विभागाची जबाबदारी मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. या पूर्वी चंद्रा अय्यंगार, निला सत्यनारायण या महिला सनदी अधिकाऱ्यांनी गृह खात्याची जबाबदारी सांभाळली आहे.

### मुंबई पालिकेत एमआयएमचा गटनेता हिंदू

मुंबईः मुंबई महापालिका निवडणुकीत एमआयएमच्या निवडून आलेल्या ८ नगरसेवकांपैकी सात नगरसेवक मुस्लिम, तर एक नगरसेवक हिंदू आहे. विशेष म्हणजे मराठी आहे. त्यामुळे एमआयएमचे नेतृत्व मुस्लिम नगरसेवकाकडे जाईल, असे वाटत होते. पण पक्षाने मराठी नगरसेवकाला गटनेता बनवून महापालिकेतील पक्षाची जबाबदारी सोपवत सर्वच राजकीय पक्षांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. एमआयएमने मुंबई महापालिकेत आपल्या स्वतंत्र गटाची नोंदणी केली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२३ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२.५० क्विंटल | २,६१० | ३,८३० | ३,१८० |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,७०० | ४,००१ | ३,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १३६.५० क्विंटल | ४,४४१ | ७,८५१ | ७,३९१ |
| उडीद : ४.५० क्विंटल | ४,८५० | ६,३०० | ५,५७५ |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,९५१ | ३,२६१ | २,७५४ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: १८४.०० क्विंटल | ४,९०० | ५,३०० | ५,१७१ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ६,७०० | ६,१३३ |

cmyk

## अग्रलेख

# पुन्हा ऐक्य घडू दिले जाणार नाही !

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान अपघातात निधनानंतर रक्षा विसर्जन होताच सत्तेचा निर्णय घेण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यावर आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्रीपद त्यांनी शनिवारी स्विकारले. आता राष्ट्रवादीचा सत्तेतील चेहरा सुमित्रा पवार असतील पण,सुत्रे कोण हालविणार असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

हे एक खुले सत्य आहे की, जेव्हा जेव्हा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी निवृत्तीचा विचार केला, तेव्हा तेव्हा त्यांच्यासमोर मोठे संकट उभे राहून त्यांना पुन्हा सूत्रे आपल्या हाती घ्यावी लागली. आता एप्रिल महिन्यात राज्यसभेतील खासदारकीची मुदत संपून पवार राजकारणातून निवृत्ती घेणार, जाता जाता आपल्या बरोबरच्या सगळ्या सहकाऱ्यांचे एकत्रीकरण करून राष्ट्रवादी एकसंघ करणार आणि अजित पवार यांच्या पाठीशी उभी करून सुप्रिया सुळे यांचे राजकारण केंद्रात स्थिर करणार, इतरांची व्यवस्था योग्य पद्धतीने लावून स्वत: त्यापासून दूर होणार अशी अटकळ बांधली जात होती. मात्र क्रूर नियतीला हे मान्य नसावे.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार काकांच्या छत्रछायेखालून बाहेर पडून स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यात यशस्वी होत असतानाच विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. सत्तेचे दुर्दैव असे की, पतीच्या निधनाचे दु:ख दूर करण्याची उसंत देखील न घेता अश्रू पुसून श्रीमती सुनेत्रा पवार यांना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्यास संमती देण्याची वेळ आली. पवार घराण्याच्या परंपरा लक्षात घेता सुनेला नेतृत्व देणे त्यांच्यासाठी अवघड ठरणारे नाही. पण या निर्णयात पवारांच्या होकारापेक्षा सुद्धा प्रफुल्ल पटेल, तटकरे, भुजबळ आणि काही अंशी मुश्रीफ, झिरवळ अशा मंडळींचा हातभार अधिक असण्याची आणि त्यांच्या तोंडून भाजपनेच हे वदवून घेतले असण्याची शक्यता अधिक आहे. ते काही असले तरी सुनेत्रा पवार यांच्या रूपाने महाराष्ट्राला पहिली महिला उपमुख्यमंत्री लाभला आहे. राजकारणापासून त्या दूर दिसत असल्या तरी राजकीय घराण्यातील असल्याने त्या अलिप्त नव्हत्या. अगदी दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणासाठी झालेल्या दहाही बैठकांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुनेत्रा पवार यांना सोबत घेतले होते. जयंत पाटील यांच्या मुंबईतील घरी झालेल्या बैठकीला देखील सुनेत्रा पवार या उपस्थित होत्या. त्यामुळे एका अर्थाने अजित पवार यांनी आपला वारसा आपल्या पत्नीकडे सोपवलेलाच होता. त्यामध्ये आपल्या दोन्ही पुत्रांना परिपक्व होण्यास अद्याप वेळ असल्याचे त्यांच्या पूर्णत: ध्यानी आलेले होते. दुर्दैवाने दादांचे निधन झाले आणि ही जबाबदारी महाराष्ट्रातील एका कुटुंबवत्सल स्त्रीला पेलावी लागत आहे. या निर्णयानंतर पुढे काय घडेल याचा अंदाज बांधणे कठीण आहे. तरीही प्रफुल्ल पटेल आणि तटकरे सोडता उर्वरित दोन्ही राष्ट्रवादीतील नेते शरद पवारांच्या शब्दाला ऐकतील. पटेल दबाव आणायला आणि तटकरे राज्यात काय घडावे हे ठरवण्यात भाजपच्या मदतीने हस्तक्षेप करत राहतील. थोडक्यात भाजपचा स्टेक कायम ठेवायचा प्रयत्न करतील. शरद पवार थेट सत्तेत सामील होणार नाहीत आणि अशा स्थितीत जबाबदारी पण घेणार नाहीत. पण, पवार कुटुंबातील लोकांची पदावरील संख्येबाबतची भूमिका ते कायम ठेवतील असे दिसत आहे.

राजकारणाचा पोत डावा की उजवा की मध्यममार्गी स्वीकारायचा हा गोंधळ इथे कायम राहील. रोहित पवार व सुप्रिया सुळे यांना सबुरीचा सल्ला दिला जाईल. लोकाग्रह झाला म्हणून त्यांना काही जबाबदारी मिळतील. पण, उपमुख्यमंत्रिपदाचा निर्णय भाजप वरिष्ठांच्या संमतीने घेतला असे दाखवून ते नावही त्यांच्याकडूनच निश्चित केले हे स्पष्ट केले जाईल. त्यांचे अनेक निर्णय राष्ट्रवादीला तापदायक ठरतील. त्याबद्दल कोणाला तक्रारही करता येणार नाही. काही करून तीन वर्षात या सगळ्यात पुन्हा ऐक्य घडू दिले जाणार नाही. त्यात काळाच्या पोटात काय दडलेय हा संभ्रम आहेच. सत्तेत आले म्हणून सावध काम न करता आमदार, खासदार वादग्रस्त वक्तव्य, कृती करून आपल्यापुरते आसन बळकट करायचा प्रयत्न करतील.

अजितदादा पवार परिवार पक्षाबाहेरून नेहमी अस्वस्थ ठेवला जाईल. काँग्रेस आणि शिवसेना, डावे पक्ष यांच्यापासून राष्ट्रवादीला एकटे पाडले जाईल. पवारांच्या राजकारणाला देखील यामुळे बट्टा लागेल तो वेगळाच. गौतम अदानी यांच्यामुळे पवार यांच्यावर दोष आहेच त्यात धर्मनिरपेक्ष मते खेचून घेऊ शकला नाही तर राष्ट्रवादीची भाजपला गरज उरणार नाही. काँग्रेस सक्षम होऊ नये यासाठी त्यांना राष्ट्रवादीचे धर्मनिरपेक्षपण शिल्लक ठेवणे आणि त्यासाठी एका वर्गाला दुसऱ्यापासून कायम दूर ठेवण्याचे राजकारण चालू ठेवावे लागेल.

परिणामी राष्ट्रवादीचा आश्वासक चेहरा कोण? आणि पक्षाच्या कृतीमागील मेंदू कुणाचा? हे प्रश्न कायमच राहतील. सुनेत्रा पवार या खेळीचे आकलन कसे करतात, शरद पवार जनतेमध्ये प्रतिमा असणाऱ्या आपल्या आमदार, खासदारांना या सगळ्यात कसे जपतात, एकीकडे सत्तेचा लाभ मिळावा अशी अपेक्षा असणारे अनुयायी, दुसरीकडे पवार घराण्यातील इतरांचे महत्त्व कमी करण्याचे राजकारण, तिसरीकडे स्व पक्षातील मोठ्या नेत्यांचे पुनर्वसन आणि पक्षाचे हरवत चाललेले अस्तित्व पुन्हा सुस्थितीत ठेवण्यासाठी करायचे राजकारण या सगळ्या खेळात पवारांना पुन्हा उतरावे लागणार आहे.

# बीड जिल्ह्याने पाहिलेले विकासाचे स्वप्न सुनेत्र ताईंच्या माध्यमातून पुर्ण होईल-अमरसिंह पंडित

## अजितदादांच्या आठवणी बीडकरांनी जागवल्या; बीड येथे शोकाकुल वातावरणात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

**दोन दिवस झाले तरी दादा आपल्यात नाहीत असे मनाला पटत नाही दादांच्या जाण्याने बीड सह महाराष्ट्राचे प्रचंड नुकसान झालेले आहे. अजित दादांचे नाव घेतल्याशिवाय महाराष्ट्राचा राजकीय इतिहास लिहिला जाऊ शकणार नाही. बीड जिल्ह्याच्या सामान्य जनतेने अजित दादा यांच्या माध्यमातून पाहिलेले विकासाचे स्वप्न उपमुख्यमंत्री सुनेत्राताईच्या माध्यमातून पूर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त करत स्वर्गीय अजितदादांच्या आठवणींना माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी भावनिक उजाळा दिला. यावेळी बीड जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार व अजित दादा प्रेमी मोठ्या संख्येने शोकसभेला उपस्थित होते.**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक दु:खद निधनाच्या निमित्ताने बीड येथील रामकृष्ण मंगल कार्यालयात सर्वपक्षिय शोकसभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अजितदादांच्या आठवणी जागवल्या. अतिशय शोकाकुल वातावरणात अजितदादांना उपस्थितांनी आदरांजली अर्पण केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार भिमराव धोंडे, बाळासाहेब आजबे, उषाताई दराडे, संजय दौंड, राजेंद्र जगताप नगराध्यक्षा प्रेमलता पारवे, सुशीलाताई मोराळे यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे नेते, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी स्व. अजित दादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी सर्वपक्षिय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच अजित दादा पवार यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक भाषणात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण म्हणाले की, सर्वांना सोबत घेऊन काम करताना शिव- शाहु- फुले- आंबेडकर विचाराला कधी दादांनी बगल दिली नाही, त्यांचे अकाली जाणे सर्वांना वेदना देऊन गेले होते. बीडला बारामती करण्याचा निर्धार केला होता. त्यांनी तसा शब्द दिला होता. उमेदीच्या काळात एक सक्षम नेतृत्व हरपले आहे. सुनेत्राताई उपमुख्यमंत्री झाल्या आहेत तेव्हा एकजुटीने पुन्हा हा विकास पुढे घेवून जाऊ. दादांच्या स्वप्नातला हा बीड जिल्हा निर्माण करुया असे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित म्हणाले की, दादा आपल्यात नाहीत हे अजूनही मनाला पटत नाही, दादा बीडचे पालकमंत्री झाले आहेत, आपल्या बीड जिल्ह्याचे चित्र बदलणार असे सर्व सामान्य जनतेला वाटत होते पण नियतीने दादांना हिरावून नेले आहे, त्यामुळे खुप नुकसान झाले आहे. शेवटच्या घटकाच्या घरापर्यंत अवकळा पसरली आहे, आपला माणूस गेल्याची भावना प्रत्येक माणसाची आहे. दादा केवळ पहिल्या



बाकावरच्या आमदारांचे नव्हते तर ते शेवटच्या बाकावर बसणा-या कार्यकर्त्यांच्या हिताचा विचार करणारे होते. महाराष्ट्राचा राजकीय इतिहास जेंव्हा लिहिला जाईल तेव्हा दादांना वगळून हा इतिहास लिहिला जाऊ शकत नाही, दादा हे या शतकाचे जननायक आहेत. तत्वाशी तडजोड न करणारा नेता आपल्यातून गेला हे अतिशय वाईट झाले आहे. दादा गेल्याचे दु:ख मलाच नाही तर प्रत्येक सामान्य माणसाला आहे. बीड जिल्ह्यातील आम जनतेने पाहिलेले स्वप्न सुनेत्रा ताईंच्या रुपाने होईल. राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे कल्याण आखाडे म्हणाले की, दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणून अजितदादांची ओळख महाराष्ट्रभर होती. विकासाभिमुख नेतृत्व म्हणून दादा सर्वपरिचित होते. मोठी संधी दादामुळे मला मिळाली. सामाजिक कार्यकर्त्या सुशिलाताई मोराळे म्हणाल्या की, आम्हाला दादा का भावले तर दादांनी आम्हाला कधीच अंतर दिले नाही. आमच्या सुख दु:खात धाऊन आले. दादांचे बीडचे आपुर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करु. माजी आमदार बाळासाहेब आजबे म्हणाले की, दादांच्या लाखो आठवणींने आमच्या मनात गर्दी केली आहे. दादा कामाचा माणूस होते. आपल्या जिल्ह्याला असा माणूस पालकमंत्री म्हणून मिळाले होते, पण त्यांचे जाणे आपल्यासाठी दूर्देव आहे. माजी आमदार उषाताई दराडे, अजितदादा हे शरद पवार साहेबांच्या कुशित तयार झालेले व्यक्तिमत्व होते. दादा सारखे नेतृत्व पुन्हा घडावे, त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून पुढे काम करावे. माजी आमदार भिमराव धोंडे म्हणाले की, अजितदादांचे कृषी, सिंचन, शिक्षण, समाज, राजकारण असे सर्व क्षेत्रात भरीव काम आहे. अजितदादांची जागा भरुन काढण्याचे काम करावे. माजी आमदार राजेंद्र जगताप म्हणाले की, सर्वांना समान न्याय देण्याचे काम दादांनी केले. सिंचनाच्या बाबतीत आणि महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी दादांनी आपले जीवन अर्पण केले. या मातीशी नाते तोडून, कार्यकर्त्यांना सोडून का गेलात... दादा परत या...परत या... अशा ओळी त्यांनी सादर केल्या. माजी आमदार संजय दौंड म्हणाले की, दादांच्या जाण्याने महाराष्ट्राची प्रचंड हानी झाली आहे. जशी बारामती उभी केली तसे मला बीडला उभे करायचे आहे, असा शब्द दादांनी दिला होता. आपण सर्वांनी आता अजितदादा यांचा वादा पुर्ण करावयाचा आहे. नगरसेवक अमर नाईकवाडे म्हणाले की, अजितदादा हा नेता आम्हाला त्यांच्या कार्यकर्तृत्वाने भावला. त्यांच्या विचाराने आपण यापुढे काम करु. उपनगराध्यक्ष विनोद मुळूक म्हणाले की, दादांच्या कामाचा उरक आणि स्पष्टवक्तेपणा हे गुण आम्ही अंगिकारु, जेष्ठ नगरसेवक मोईन मास्टर म्हणाले की, सर्व समाजाला सोबत घेऊन काम करणारे, अन्यायाला वाचा फोडणारे अजितदादा एक हिरा होते, तो हिरा आता आपल्यातून हरपला आहे. दादांचे कार्य आपण सर्वांनी पुर्ण करावे. राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाच्या वतीने दादासाहेब मुंडे म्हणाले की, ६५ वर्षांच्या महाराष्ट्रात ६६ वर्षांचा उपमुख्यमंत्री अजितदादांनी अर्थमंत्र्यांची यशस्वी परंपरा पुढे नेली. सिंचन क्षमता वाढली पाहिजे त्यामुळे शेतीचा विकास होणार हा विचार करणारे अजितदादा आज आपल्यात नाहीत, त्यामुळे आपले खुप मोठे नुकसान झाले आहे. त्यांनी दिलेला संदेश आणि विचार घेऊन आपण पुढे जावूया. शिवसंग्रामचे अनिल घुमरे म्हणाले की, स्व. विनायक मेटे गेल्यानंतर आमच्या अडचणीच्या काळात दादांनी आम्हाला बळ दिले. अजितदादा आणि मेटे यांच्या विचारांवर आपण यापुढील काळात काम करु. भारतीय जनता पक्षाचे शंकर देशमुख दादांचा आदर्श घेऊन काम करु असे ते म्हणाले, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष ॲड. शेख रफिक म्हणाले, शिस्त आणि वक्तशीरपणा हा गुण दादांचा आपण सर्वांनी या निमित्ताने घेतला पाहिजे. बीड नगर परिषदेचे गटनेते फारुख पटेल म्हणाले की, मुस्लिम समाजाला सत्तेत मोठा वाटा देण्याचे काम अजितदादांनी केले. भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष अशोक लोढा म्हणाले की, अल्पसंख्याक अशा जैन समाजाला राजकारणाच्या प्रवाहात आणण्याचे काम अजितदादा पवार परिवाराने केले शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप म्हणाले की, अजितदादांच्या नेतृत्वाखाली काम करताना आंदोलने केली, त्यातून आम्हाला खुप कांहीं शिकायला मिळाले. आज दादा आपल्या नाहीत, फार वाईट वेळ आपल्यावर आली आहे. चांगले माणसं अकाली जाणे बीडचे दुर्दैव आहे. अजित दादा आज आपल्यात नाहीत पण प्रत्येकाच्या मनात आहेत. अजितदादांचे राहिलेले काम अमरसिंह पंडित यांनी यापुढे पूर्ण करावे. सरपंच संघटनेच्या वतीने कुंडलिक खांडे म्हणाले की, दादा एक धडाडीचे नेतृत्व होते. काम तडीस लावणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. बीडला चांगला पालकमंत्री मिळाला होता, त्यांच्या अकाली जाण्याने बीड जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे. यावेळी कृती समितीचे मारोती तिपाले, वकिल संघाचे अध्यक्ष ॲड. पिसोरे, राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, सि ए असोसिएशनचे सि.ए. बी.बी. जाधव, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख वरेकर, आंबेडकर चळवळीतले सक्रिय कार्यकर्ते अजय सवाई, मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने गंगाधर काळकुटे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# अर्थसंकल्पाआधी सोनं स्वस्त!

**पुणे । प्रतिनिधी**

**रविवारी देशाचा अर्थसंकल्प सादर होणार आहे, पण त्याआधीच सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सोन्याच्या दरात मोठी घट नोंदवण्यात आली आहे. शनिवारी सराफा बाजार उघडताच सोन्याची किंमत धडाम करत कोसळली.**



२४ कॅरेट सोन्याच्या किमतीमध्ये प्रति ग्रॅम ८६२ रुपयांची कपात नोंदवण्यात आली आहे, तर प्रति तोळा सोनं ८६२० रुपयांनी स्वस्त झाले आहे. १० तोळे सोनं सराफा बाजार उघडताच ८६ हजार २०० रुपयांनी घसरले. रविवारी केंद्रीय अर्थमंत्री अर्थसंकल्प सादर करणार आहेत, पण त्याआधीच सोन्याच्या किमतीत घट नोंदवण्यात आली आहे. अर्थसंकल्पाच्या २४ तास आधी सराफा बाजारात सोन्याच्या किमतीत मोठी घसरण नोंदवण्यात आली आहे. सोने अन् चांदीच्या दागिन्यांच्या खरेदीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार मोठा निर्णय घेणार असल्याची चर्चा बाजारात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र सरकार सोने आणि चांदीवरील आयात शुल्क कमी करण्याची शक्यता आहे. अर्थसंकल्पात हा निर्णय घेतला गेला तर दागिन्यांच्या किमती आणखी कमी होऊ शकतात. याचा सर्वसामान्यांनाही मोठा फायदा होईल, असे सांगण्यात येत आहे.

# बोगस ड्रायव्हींग लायसन्स देणारे आरोपी पकडले

**जालना । प्रतिनिधी**

**अभीजित बावस्कर, सहायक मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन अधिकार, यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. अज्ञात आरोपीतांनी एक बनावट वेबसाईट बनवून सरकारी संगणक प्रणालीमध्ये अनाधिकृतपणे प्रवेश करुन सरकारी प्रक्रियेचा दुरुपयोग करुन नागरीकांकडुन आर्थिक फायदयाच्या दृष्टीने बनावट लर्निंग ड्रायव्हींग लायसन्स मिळवून दिले यावरुन सायबर पोलीस ठाणे जालना गु.र.नं.२३/२०२५ कलम ३१८(४), ३३६(२) (३), ३४०(२) भा.न्यां.सं. सह ४३(१)()(), ६६(), (), ७२, ७२ () आय.टी. ॲक्टसह कलम ३,४,७ मोटार वाहन अधिनियम सह नियम ११ केंद्रीय मोटार वाहन कायदा अन्वये अज्ञात आरोपीतांविरुध्द गुन्हा दाखल झाला. सदर गुन्हयाच्या आरोपी निष्पन्न झाल्यानंतर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन आरोपीतांचा शोध घेणेकामी मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल . मा. अपर पोलीस अधीक्षक , स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक, श्री. गुणाजी शिंदे, सायबर पोलीस ठाणे, जालना यांना सुचना देवून मार्गदर्शन केले व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करुन गुन्हातील आरोपी शोध घेणेबाबत सुचना दिल्या होत्या.**

त्यानुषंगाने पोलीस पथकानेआरोपीताचा शोध घेणेकामी दिनांक २७/०१/२०२६ रोजी रवाना झाले. गुन्हयातील आरोपी अमर शिव भारती, वय-२५ वर्ष, व्यवसाय-खाजगी नौकरी, रा. पिया एक्झोटीका, काहिलापारा, ता.दिसपुर, जि. गुवाहाटी, राज्य आसाम मुळ राहणार- राजमंदीर कलान, ता. फरेंदा, जि. महाराजगंज, राज्य उत्तरप्रदेश हा त्याचे अस्तित्व लपवत असल्याने व राहण्याचे ठिकाण महाराजगंज, गोरखपुर, वाराणसी उत्तरप्रदेश असे वारंवार बदलत असल्याने त्याचा शोध घेण्यास अडचणी निर्माण होत होत्या. त्यानुषंगाने तांत्रिक विश्लेषण करुन आरोपीताची माहिती प्राप्त केली असता आरोपी वाराणसी, उत्तरप्रदेश येथे असल्याचे दिसून आल्याने वाराणसी येथे जावून आरोपीताचा शोध घेवून त्यास ताब्यात घेतले. दिनांक ३१/०१/२०२६ रोजी गुन्हयातील अटक आरोपीतास सायबर पोलीस ठाणे, जालना यांनी मा. न्यायालयात हजर केले असता आरोपीतास दि. ०५/०२/२०२६ पावेतो पोलीस कोठडी मिळाली आहे. सदर गुन्हयामध्ये यापूर्वी कुपवाडा-जम्मू कश्मीर, सहरसा-बिहार, जालना येथुन तीन आरोपी अटक केले आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस व सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. गुणाजी शिंदे, पोउपनि. राजेंद्र वाघ, पोउपनि योगेश चव्हाण, यांच्या पथकाने कारवाई केली.






# जिल्हाधिकारी कार्यालयात दिवंगत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित आशाताई अनंतराव पवार यांना जालना जिल्हाधिकारी कार्यालयात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेस सर्व अधिकारी- कर्मचा-यांनी पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करत सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी आमदार हिकमत उढाण, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, नायब तहसीलदार तुषार निकम, सतीश तायडे, सुनिल काळुंखे यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पान १ वरून...

### नमो शेतकरीचा हप्ता चालू

यांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना आर्थिक हातभार लागावा, या हेतूने वर्षाला ६ हजार रुपये देण्याचे घोषणा केली होती. ही मदत तीन हप्त्यांत मिळत आहे. योजनेची सुरुवात डिसेंबर २०१८ मध्ये करण्यात आली. आतापर्यंत शेतकऱ्यांना २१ हप्ते मिळालेले आहेत. तर आता या योजनेत नवीन निकष आहेत.

---------------

### दादांचा वारसा

राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री आणि आमदार उपस्थित होते. यावेळी अजितदादा पवार अमर रहे, सुनेत्रा पवार तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है! अशा घोषणा अजितदादांच्या कार्यकर्त्यांनी दिल्या. या आगोदर शुक्रवारी सकाळी अजित पवारांचे अस्थिविसर्जन होताच दुपारी बाराच्या सुमारास सुनील तटकरे, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रवादीचे बडे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या बैठकीसाठी वर्षा बंगल्यावर पोहोचले. या बैठकीत त्यांनी सुनेक्षा पवार यांना उपमुख्यमंत्री करण्याचा प्रस्ताव मांडला. मुख्यमंत्र्यांनी या प्रस्तावाला होकार दिल्यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी सुनेत्रा पवारांची भेट घेतली. या भेटीत राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या विनंतीला सुनेत्रा पवारांनी संमती दिली. शनिवारी दुपारी राष्ट्रवादीच्या विधिमंडळ पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीत विधिमंडळ पक्षाच्या नेत्या म्हणून सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात आली. या भेटीनंतर राष्ट्रवादी पक्षाचे नेते मुख्यमंत्र्यांकडे पोहोचले. या बैठकीत राष्ट्रवादीच्या नेत्यांनी देवेंद्र फडणवीसांना सुनेत्रा पवारांच्या निवडीचे पत्र दिले. यानंतर संध्याकाळी पाच वाजता शपथविधी पार पडला.

------------

### १२ फेब्रुवारीला होणार होते

शरद पवार यांनीही विलिनीकरणाची चर्चा सुरु होती आणि तारीख सुद्धा ठरली होती, अशी माहिती दिली. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व नेते प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ करत आहेत. छगन भुजबळ, सुनील तटकरे यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. जयंत पाटील म्हणाले की, विलिनीकरणासाठी १२ फेब्रुवारी तारीख का ठरली होती कारण दोन्ही पक्ष आधी एकत्रित करायचे मग नंतर बाकीचे निर्णय घ्यायचे असे अजितदादांच्या मनात होते. या चर्चेमध्ये सुप्रिया सुळे यांना आवर्जून घेतले होते. सुनेत्रा वहिनींचा शपथविधी हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे; मुख्यमंत्र्यांची त्याला संमती असल्यानेच हा निर्णय होत आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे निर्णय सध्या प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ घेत आहेत असे दिसते. राष्ट्रवादी एकीकरणाच्या निर्णयाबाबत अजितदादांनी बाकीच्या नेत्यांना मी सांगितले की, एकमताने निर्णय होतो असे अजितदादांचे मत होते. त्यांनी सांगितले की, नियती किती क्रूर असू शकते हे अजितदादांच्या घटनेवरून दिसून येते, पण विमान हवेत असताना विमानातून मोठा आवाज येत होता असे तेथील एका सरपंचांने मला सांगितले. विमानामध्ये काय प्रॉब्लेम होता, का नव्हता याबाबत ब्लॅक बॉक्समधून जे समोर येईल त्यातून काही गोष्टी समोर येतील. अजित पवार, दिलीप वळसे पाटील, आर आर पाटील आणि माझ्यामध्ये कधी एकमेकांशी स्पर्धा झाली नाही, असे ते म्हणाले. मी ज्या नेतृत्वासोबत चर्चा करत होतो तेच नेतृत्व आता नाही, आता ज्यांच्याकडे पक्षाचा निर्णय घेण्याची क्षमता आहे, त्यांनी आता तो निर्णय घेऊन अजित दादांचे शेवटचे स्वप्न पूर्ण करावे, असे ते म्हणाले.

--------------

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष 'पाटील'

मराठा समाजाचा मराठमोळा असलेल्या राष्ट्रवादी पक्षाचा अध्यक्ष हा 'पाटील' असावा 'पटेल' नको अशी उपहासात्मक टीका त्यांनी केली आहे. गेल्या काही काळात महाराष्ट्राच्या राजकारणाचा पार विचका झाला आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. पुढे ते म्हणाले की शनिवारी दिवसभर ज्या घडामोडी सुरु आहेत त्यावर बोलावंच लागेल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या अस्सल मराठमोळ्या मातीतला, आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष हा कोणीही मराठी असावा, पाटील असावा पण पटेल नाही, अशी थेट टीका त्यांनी केली आहे.

-----------

### जा मर म्हणणं म्हणजे जीवन

आदेश केला रद्द. या प्रकरणातील याचिकाकर्ता (३० वर्षीय तरुण) एका विवाहित महिलेसोबत नात्यात होता. मात्र त्याने महिलेशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. यावरुन २०२३ मध्ये दोघांमध्ये जोरदार वाद झाला. या वादादरम्यान तरुणाने विवाहितेला ''जा आणि मर'' असे म्हटले. यानंतर त्या महिलेने तिच्या साडेपाच वर्षांच्या मुलीसह जीवन संपवले होते.

--------------

### विलीनीकरणाच्या मुद्यावर

उत्तर देण्यासाठी केवळ अजित पवारच सक्षम होते. ही चर्चा कदाचित त्यांच्याबरोबर झाली असती आणि त्यांनी आमच्याशी यावर चर्चा केली असती तर त्यातून समाधान निघाले असते. पण आता हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे. मावळचे आमदार सुनील शेळके या विषयावर बोलताना म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवारांचा आहे. विधिमंडळ पक्ष वेगळा आहे आणि संघटन वेगळे आहे. विधिमंडळ पक्षाची सूत्रे सुनेत्रा पवार यांच्या हातात दिल्यानंतर त्याच त्यासंबंधी निर्णय घेतील. तर शपथविधी पार पडल्यानंतर अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी दोन्ही गट एकत्र आले पाहिजेत असे स्पष्टपणे सांगितले. स्वराज्य एकत्रीत राखावे लागते नाहीतर तिसरा याचा फायदा घेतो,असे ते म्हणाले.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. १ फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात



माजलगाव:- विधानभवन येथे लोकनेते, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना माजलगाव विधानसभेचे आमदार प्रकाश सोळंके



### जिजामाता नर्सिंग ॲण्ड फिजिओथेरपी महाविद्यालयामध्ये दादांना श्रद्धांजली

माजलगाव । प्रतिनिधी

विकास प्रतिष्ठान संचलित जिजामाता नर्सिंग आणि जिजामाता फिजिओथेरपी कॉलेज मध्ये महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे निधन झाल्यामुळे प्राचार्य डॉक्टर आनंद बाबू सर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व श्रद्धांजली वाहण्यात आली तसेच याप्रसंगी जिजामाता नर्सिंग कॉलेजचे उपप्राचार्य प्रवीण कुमार सर . कॉलेजचे ऑफिस सुप्रीटेंडंट वाघ सर, शिंदे सर, इरफान पठाण सर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तहसील बीड व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्या संयुक्त विद्यमाने आपदा मित्र–सखी प्रशिक्षण कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

तहसील कार्यालय, बीड व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आपदा मित्र–सखी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण ११ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून, आपत्ती व्यवस्थापन, प्राथमिक बचाव कार्य, आपत्कालीन परिस्थितीत मदत व जनजागृती यासंबंधी महत्त्वाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणासाठी स्वयंच्छेने सहभागी होऊ इच्छिणारे खेळाडु, शिक्षक, कर्मचारी, समोदशक गृह रक्षक दलाचे सदस्य, सेवाभावी संस्था, तरुण मंडळे, बचाव गटांचे सदस्य यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण हे पूर्णतः स्वयंसेवी स्वरुपाचे असून, प्रशिक्षणार्थींना कोणताही मोबदला दिला जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.आपत्तीच्या वेळी समाजासाठी मदतीस तत्पर राहण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याने पात्र व इच्छुक व्यक्तींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसील प्रशासन, बीड यांच्यावतीने करण्यात येत आहे.

# शोकसभेतून परळीकरांनी जागवल्या दादांच्या आठवणी

## परळीत सर्वपक्षीयांच्या वतीने अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. महाराष्ट्रात सर्वत्र शोकसभांचे आयोजन करून अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. या पार्श्वभूमीवर परळीतही शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेत तमाम परळीकरांच्या वतीने सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी अजितदादांच्या कर्तुत्वाचा उजाळा घेत दादांच्या आठवणी जागवल्या.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथे दिवंगत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोक सभेला सर्वपक्षीय पदाधिकारी व सर्व स्तरातील नागरिक सहभागी झाले होते. अजितदादा पवार यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख प्रत्येकाने आपल्या शोक भावनेतून व्यक्त केला. या शोकसभेत माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी शोक प्रस्ताव मांडला. आपल्या शोक भावना व्यक्त करताना अजितदादा पवार यांच्याशी आलेला संबंध व परळीच्या विकासाच्या दृष्टिकोनातून अजितदादा पवार यांचे योगदान याविषयीची भावना त्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर व्यक्तिगत पातळीवर अजितदादा हे नेतृत्व किती आत्मीय आणि शिस्तबद्ध नेतृत्व होते





याच्या दुर्मिळ आठवणीही बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी यावेळी सांगितल्या. सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांनी यावेळी आपापली मनोगते व्यक्त करून दिवंगत अजितदादा पवार यांच्या विषयीच्या शोक भावना व्यक्त केल्या.

यावेळी परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह शिवसेनेचे राज्य समन्वयक ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, ज्येष्ठ नेते पी. एस. घाडगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख, बाजार समितीचे सभापती सूर्यभान मुंडे , माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर रिपाईचे ज्येष्ठ नेते भास्करनाना रोडे, भाजपा ज्येष्ठ नेते शांतीलाल जैन,ज्येष्ठ नेते प्रा.दासू वाघमारे, काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबा शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष आयुब खान पठाण, तुळशीराम पवार, राजा खान पठाण, नगरसेवक पवन मुंडे, दीपक मुंडे राजा पांडे, भीमा डावरे, महेंद्र रोडे, नितीन रोडे, शकील कुरेशी, अजित कच्छी,अनंत इंगळे, योगेश मेनकुदळे, भाजपा नेते महादेव इटके, अरुण पाठक सुशील हरंगुळे रमेश पवार,जयराज देशमुख, जालिंदर नाईकवाडे आश्विन मोगरकर,सुरेश टाक, राजेंद्र सोनी ,दत्ता सावंत संजय फड,ज्येष्ठ नेते डी.जी. मस्के, के.डी. उपाडे, एडवोकेट दत्तात्रय आंधळे, ज्ञानोबा माऊली आघाव ,व्यापारी बंडू गरुड,ओमप्रकाश सारडा, प्रा. एम एल देशमुख, उत्तम माने, रवी मुळे, रवींद्र परदेशी दिनेश गजमल, गिरीश भोसले, तुकाराम धोत्रे ,अजयकुमार गंडले, रवी आघाव ,पवन फुटके धम्मा अवचारे, बापू गायकवाड, बंटी सातपुते, शरद चव्हाण, किरण सावजी सचिन मराठे, सुरेश नानवटे, अन्नपूर्णा ताई जाधव, विजयाताई दहिवाळ आदिंसह परळी शहरातील विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी, संघटनांचे पदाधिकारी, व्यापारी, पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शाळांच्या स्वच्छतेसाठी सीईओ जितिन रहेमान यांचे कठोर निर्देश

## जिल्हा परिषद कार्यालयातील ''शौचालय स्वच्छता'' गांधीगिरी आंदोलनास यश

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद अंतर्गत दि. १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात आलेली ''हमारा शौचालय, हमारा भविष्य'' ही मोहीम केवळ कागदोपत्रीच राबविण्यात आल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सहकाऱ्यांसह गांधीगिरी आंदोलन केले.

दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाड्यांमध्ये अनेक ठिकाणी शौचालयांचा अभाव असून, काही ठिकाणी उपलब्ध शौचालये वापरण्यायोग्य नसल्याने विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांची शारीरिक व मानसिक कुचंबणा होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद मुख्य इमारतीतील सीईओ यांच्या केबिनसमोरील पुरुष शौचालयाची स्वच्छता करून गांधीगिरी पद्धतीने



आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल घेत सीईओ जितिन रहेमान यांनी जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये स्वच्छतेबाबत कठोर अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत.संबंधित विभागाकडून सर्व गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समित्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या असून, स्वच्छतेबाबत कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशाराही देण्यात आला आहे.विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी रुजवणे, आजारांचा प्रसार रोखणे व आरोग्यदायी शालेय वातावरण निर्माण करणे या उद्देशाने शाळा परिसर, वर्गखोल्या, स्वच्छतागृहे व पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेवर विशेष भर देण्यात येणार आहे. तसेच शाळांची नियमित तपासणी केली जाणार असून, दुर्लक्ष आढळल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.या निर्णयाबाबत डॉ. गणेश ढवळे यांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेचे स्वागत केले आहे.



**बीड : जुना मोंढा, बीड येथे मोरया प्रतिष्ठान, व्यापारी महासंघ, कृषी साहित्य विक्रेते संघटना, होलसेल किराणा असोसिएशन, रिटेल किराणा असोसिएशनच्या वतीने स्व.अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी नगरसेवक अमर नाईकवाडे आदी.**

# जयभवानी महाविद्यालयात लिंगसमानतेसाठी डिजिटल प्रतिज्ञा कार्यक्रम संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या अंतर्गत (महिला) तक्रार निवारण समिती व राष्ट्रीय महिला आयोग युवामंथन कॅम्पस कॉलिंग प्रोग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात ''डिजिटल प्रतिज्ञा : लिंगसमानतेसाठी'' हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये लिंगसमानता, महिलांविषयी आदर, तसेच सुरक्षित व सन्मानजनक शैक्षणिक वातावरण याबाबत जनजागृती करणे हा होता. या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमातून लिंगभेद नष्ट करण्याची, महिलांविरोधातील हिंसाचारास ठाम विरोध करण्याची, तसेच सर्वांना समान संधी व सन्मान



देण्याची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमात अंतर्गत (महिला) तक्रार निवारण समितीच्या पीठासीन अधिकारी प्रा. ज्योती रकटे यांनी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, तक्रार निवारण प्रक्रिया तसेच राष्ट्रीय महिला आयोगयुवामंथन उपक्रमाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभलेला हा उपक्रम सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा ठरला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमास अंतर्गत (महिला) तक्रार निवारण समितीच्या पीठासीन अधिकारी प्रा. ज्योती रकटे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक, प्रा. डॉ. अशोक देवगुडे, प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. सोमनाथ घाडगे, प्रा. डॉ. सुनील जाधव, प्रा. नारायण फुन्ने तसेच सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# माजलगाव वकील संघात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष,राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांचे दि. २८ जानेवारी रोजी बारामती येथील विमान अपघाताचे दुर्घटनेत निधन झाले.त्यांच्या अकाली निधनाने कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली असून त्यांच्या निधनामुळे संबंध महाराष्ट्र शोकसागरात आहे. त्याचाच भाग म्हणून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना माजलगाव वकील संघाचे वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

माजलगाव वकील संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.यावेळी वकील संघाचे अध्यक्ष एस.एम. सिद्धिकी (मनसबदार),उपाध्यक्ष एम.एन.जाधव,सचिव नारायण तेलगड,ग्रंथपाल हिंगण,कोषाध्यक्ष खेत्री,तसेच सीनीयर विधीज्ञ व्ही.जी.तिडके,ॲड.बि.आर.डक,यांनी अजित दादांच्या जीवनाविषयी मनोगत व्यक्त केले तर यावेळी सिनियर ॲड.टि. एन.कोल्हे, ॲड.ए.डी. घाडगे,ॲड.नाईकोडे, ॲड.शिंदे यांच्यासाह आदी वकील संघाचे सदस्य मंडळी उपस्थित होते.

# मराठी पत्रकार परिषदेच्या पुरस्कारांचे वितरण २२ फेब्रुवारी रोजी

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणारया पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण आणि राज्यातील तालुका अध्यक्षांचा मेळावा रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे होत आहे.. येत्या २२ फेब्रुवारी २०२६ रोजी, रविवारी कर्जत येथील रॉयल गार्डनमध्ये सकाळी ११ वाजता हा सोहळा होत असल्याची माहिती एस.एम.देशमुख यांनी दिली..

ग्रामीण महाराष्ट्रात अनेक तालुका पत्रकार संघ उत्कृष्ट पत्रकारितेबरोबरच समाजासाठी देखील अनेक उपक्रम राबवत असतात.. त्यांच्या या कार्याचा राज्य पातळीवर सन्मान व्हावा, त्यांचं कौतूक व्हावं यासाठी प्रत्येक महसूल विभागातून एका तालुका पत्रकार संघाची आदर्श पत्रकार संघ पुरस्कारासाठी निवड केली जाते.. यावर्षी विशेष बाब म्हणून विदर्भातून दोन तालुका संघांना हा पुरस्कार दिला जात आहे.. तसेच मुंबई विभागातूनही एका पत्रकार संघाची निवड करण्यात आली आहे.. यापुर्वी पुरस्कार वितरण सोहळे नागपूर,पाटण, अक्कलकोट, गंगाखेड, नगर जिल्ह्यातील कर्जत, माहूर, सेलू, वडवणी, पालघर आदि ठिकाणी झाले आहेत.. यंदा रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा होत आहे.. मानपत्र, मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे आहे.. परिषदेचे हे पुरस्कार राज्यात अत्यंत प्रतिष्ठेचे समजले जातात..

२०२५ च्या पुरस्कारांचे मानकरी

पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार यंदा परभणी जिल्हा पत्रकार संघाला जाहीर झाला आहे..

वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कारांचे मानकरी पुढील प्रमाणे आहेत..

नागपूर विभाग : बेला तालुका पत्रकार संघ जिल्हा नागपूर

नागपूर विभाग : चामोर्शी तालुका पत्रकार संघ, जि. गडचिरोली

नाशिक विभाग : नांदगाव – मनमाड मराठी पत्रकार संघ जिल्हा नाशिक

कोंकण विभाग : पनवेल महानगर प्रेस क्लब जि. रायगड

पुणे विभाग : आंबेगाव तालुका पत्रकार संघ जि. पुणे

लातूर विभाग : किनवट तालुका पत्रकार संघ जि. नांदेड

संभाजीनगर विभाग : अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ जि.बीड

अमरावती विभाग : संग्रामपूर तालुका पत्रकार संघ जि.बुलढाणा

कोल्हापूर विभाग : पलूस तालुका मराठी पत्रकार संघ जि. सांगली. मुंबई विभाग : उपनगर पत्रकार असोशिएशन, पुरस्कार वितरण सोहळयास मोठ्या संख्येनं उपस्थित राहण्याचं आवाहन एस.एम.देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, कोकण विभागीय सचिव मनोज खांबे, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष संजय मोहिते, दर्वेश पालकर आदिंनी केले आहे.

# उसन्या पैशाच्या वादातून धक्काबुक्की; तरुणाचा मृत्यू

सिरसाळा । प्रतिनिधी

उसणे दिलेल्या पैशांच्या वादातून झालेल्या धक्काबुक्कीत एका तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. संजू गंगाराम उबदे वय ४० वर्ष, रा.सिरसाळा असं मृत व्यक्तीचं नाव आहे.

येथील मसनजोगी वस्तीत राहणारे सायलू रामलू पस्तमवाड आणि गंगा पस्तमवाड यांचा संजू उबदे याच्याशी पैशांच्या उसने दिलेल्या दोनशे रुपयाच्या कारणावरून वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की, सायलू आणि गंगा यांनी संजू उबदे यांना पाठीवर जोरात धक्का दिला. या धक्क्यामुळे संजू यांचा तोल गेला आणि ते तोंडावर जमिनीवर आदळले. यात त्यांच्या डोक्याला व तोंडाला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. घडलेल्या घटनेची माहिती मिळताच सिरसाळा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे सिरसाळा परिसरात खळबळ उडाली आहे.

## पान ६ वरुन...

### अजित दादा.. लाडक्या बहिणींना

उजाळा देतांना सांगितले की, यावर्षीच्या रक्षाबंधनाला दादांच्या हातावर पहिली राखी बांधण्याचा मान मला मिळाला, हा क्षण माझ्या आयुष्यातील सर्वोच्च सुवर्णक्षण होता. एका शेतकरी कुटुंबातील एक सामान्य मुलगी थेट नगराध्यक्ष पदापर्यंत पोहोचू शकली, याचे श्रेय त्यांनी स्पष्टपणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दिले. त्या म्हणाल्या, शेतकऱ्यांची सामान्य मुलगी नगराध्यक्ष पदावर पोहोचू शकते, हे फक्त अजितदादा आणि प्रकाशदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच शक्य आहे. अजित दादांच्या निधनाने झालेलं आतिव दुःख व्यक्त करतांना त्यांचे शब्द अधिकच हृदयद्रावक होते.

वडील गेले त्यापेक्षा दादा गेल्याचं दुःख अधिक आहे. वडील फक्त आमच्या कुटुंबाचे होते, पण अजितदादा हे संपूर्ण महाराष्ट्राच्या कुटुंबाचे प्रमुख होते, असेही त्या म्हणाल्या. तसेच आपल्या अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांबाबत बोलतांना नगराध्यक्षा वंदनाताई जगताप या खुपचं भावूक झाल्या. माझं स्वप्न होतं दादा की, नगरपंचायतीच्या आपल्या नविन इमारतीचं उदघाटन तुमच्या हस्ते व्हावं.नविन इमारतीतल्या नगराध्यक्ष पदाच्या खुर्चीवर सर्वप्रथम तुम्हालाच बसवून तुमच्यासोबत फोटो काढायचा होता. पण हे स्वप्न अपूर्णच राहिलं. ही रुखरुख आयुष्यभर मनात राहील, असे त्यांनी सांगितले. शेवटी त्यांनी देवावरचा रागही व्यक्त केला. या महाराष्ट्रातील बहिणींना तुम्ही इतकं काही दिलंत, तरीही त्यांच्या आशिर्वादात काही कमी पडलं का? हा प्रश्न आणि देवावरचा हा राग कायम मनात राहील, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच अजितदादांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक कुटुंबप्रमुख गमावला आहे. त्यांच्या विचारांचा, त्यांच्या कर्तृत्वाचा आणि बहिणींप्रती असलेल्या प्रेमाचा वारसा कायमच पिढ्या न पिढ्या कायम जिवंत राहील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

### श्री विश्वकर्मा जयंती

पांचाळ,पत्रकार परमेश्वर वैद्य,संपत पांचाळ, नवनाथ पांचाळ, रामभाऊ वैद्य, राजकमल देशमुख, प्रदीप वैद्य, बाळासाहेब पांचाळ, नागेश शेटे,उत्तम शिंगाडे,शिवम पिंपळे,कृष्णा काकडे,ज्ञानेश्वर पांचाळ, बाळू पांचाळ, वैजनाथ पांचाळ ,पांडुरंग पांचाळ ,बालाजी पांचाळ व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महासांगवी येथे श्री क्षेत्र

सहभाग नोंदविला. या सोहळ्यास माजी आमदार भीमराव धोंडे, शंकर देशमुख, महबूब शेख, मधुकर तात्या गर्जे, महेंद्र तात्या गर्जे, बाळासाहेब सानप, नगरसेवक संभाजीनगर अनुरथ सानप, नामदेव सानप (सरपंच, महासांगवी), शिवाजीराव गर्जे, स्वामी सानप, किसन देवा सानप यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कीर्तनानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संस्थानच्या वतीने उत्कृष्ट नियोजन करण्यात आल्यामुळे हा २८ वा पुण्यतिथी सोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाला.

cmyk

# लातूरला १७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द

लातूर / प्रतिनिधी

यंदाच्या रब्बी हंगामात जिल्ह्यात शेतकऱ्यांना खते, बियाणे आणि कीटनाशकांसाठी अडचणी आल्या. अनेक कृषीसेवा केंद्रांनी लिंकिंग करुनच खते व बियाण्यांची विक्री केली. अनेक त्रस्त शेतकऱ्यांनी केंद्रचालकांची मनमानी सहन केली. शेतकऱ्यांच्या तक्रारी लक्षात घेऊन कृषी आयुक्तातीलील नियंत्रण व गुणनियंत्रण विभागाच्या संचालकांनी राज्यभरात भरारी पथकांची नियुक्ती केली. या पथकांनी केलेल्या तपासणीत अनेक कृषी सेवा केंद्रात त्रुटी आढळून आल्या. यातील गंभीर त्रुटी आढळून आलेल्या १७ केंद्रांचे परवाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी कायमस्वरूपी रद्द केले आहेत. तर आठ कृषी सेवा केंद्रांना सक्त ताकीद दिली आहे.




यंदाच्या रब्बी हंगामात पेरण्या उशिराने सुरुवात झाल्या. पाऊस उशिरापर्यंत सुरू राहिल्याने शेतकरी मशागतीच्या कामात व्यस्त राहिले. खरिपातील अतिवृष्टीमुळे आर्थिक अडचणी आल्या. यामुळे शेतकऱ्यांना बियाणे, खत आणि कीटकनाशकांसाठी आर्थिक कोंडी झाली. याचा फायदा कृषी सेवा केंद्रांनी घेतला. शेतकऱ्यांची अडवणूक केली. मागणीनुसार खत व बियाणे पुरवठा केला नाही. लिंकिंग करूनच खत व कीटकनाशकांची विक्री केली. शेतकऱ्यांची ओरड सुरू होताच कृषी विभागाने कडक पावले उचलली. पुण्याच्या कृषी आयुक्तालयातील नियंत्रण व गुणनियंत्रणाच्या विभागाच्या संचालकांच्या सूचनेनुसार जिल्ह्यात भरारी पथकाची स्थापना करण्यात आली. ही पथके तसेच कृषी अधिकाऱ्यांनी (गुणनियंत्रण) यांनी जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्रांची तपासणी केली. तपासणीत काही केंद्रांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या. या केंद्रांना कारवाईसाठी कारणे दाखवा नोटिसा बजावून आठ जानेवारी रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कोळेकर यांच्या अध्यक्षतेखाली अंतिम सुनावणी घेण्यात आली. सुनावणीनंतर १७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले. यात मध्ये बियाणे विक्रीचे तेरा, खत विक्रीचे दोन तर कीटकनाशक विक्रीच्या दोन परवान्यांचा समावेश आहे. दरम्यान आठ कृषी केंद्रांना सक्त ताकीद देण्यात आल्याचे कोळेकर यांनी सांगितले.

### यामुळे झाली मोठी कारवाई

साठाफलक व भावफलक प्रदर्शित न करणे, साठा नोंदवही आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, भावफलक, साठा नोंद अद्ययावत न ठेवणे, विक्री बिलावर शेतकऱ्यांची सही किंवा अंगठा न घेणे, बियाण्यांचा संपूर्ण तपशील बिलात न लिहिणे, उत्पादकाचा स्रोत न दर्शविणे, ई-पॉस वरील खत साठा आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, खतासोबत इतर निविष्ठांची लिंकिंग करणे, परवाना असूनही दुकान बंद ठेवणे आदी त्रुटींमुळे कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आली आहे.

# कॅरी निर्भीक कोंबडी ;पोल्ट्री व्यवसायासाठी उत्तम पर्याय!



राज्यासह देशभरात कुक्कुट पालन व्यवसाय करणाऱ्यांसाठी एक कोंबडी चांगलीच फायदेशीर ठरणारी आहे. या कोंबडीचे पालन केल्यास उत्तम फायदा होण्याची गॅरंटी आहे. बेरोजगार तरुणांना कुक्कुट पालनासाठी महाराष्ट्र राज्य सरकारकडून बँक कर्ज देखील मिळते. त्यामुळे ज्यांना कमी भांडवलात कुक्कुट पालनाचा व्यवसाय करायचा असेल त्यांच्यासाठी ही कोंबडी चक्क वरदान ठरणार आहे. कोंबडीच्या त्या जातीचे नाव आहे कॅरी निर्भीक.

व्यवसायातून मिळेल दामदुप्पट नफा

कॅरी निर्भिक ही कोंबडीची एक देशी जात आहे, जिचे मांस प्रथिने गुणधर्मांनी समृद्ध आहे. ही कोंबडी अतिशय चपळ असते. आकाराने मोठी, ताकदवान, दिसायला देखणी, स्वभावाने लढाऊ आणि मजबूत प्रतिकार शक्तीची असते. सुमारे २० आठवड्यांच्या आतच या कोंबड्यांचे वजन १८४७ ग्रॅमपर्यंत पोहोचते. दरवर्षी या कोंबड्या तब्बल १९० ते २०० अंडी देतात. आणि प्रत्येक अंड्यांचे वजन ४५ ग्रॅम असते. कॅरी निर्भीक कोंबड्यांचा पोल्ट्री फार्म सुरू करून कमी खर्चात शेतकऱ्यांना दामदुप्पट नफा कमाविता येऊ शकतो. इंडो - जर्मन यांच्या संयुक्त प्रयत्नातून या कोंबडीची जात साल २००० मध्ये विकसित करण्यात आली होती.कॅरी निर्भीकची वैशिष्ट्ये : उत्कृष्ट अंडी उत्पादन - वर्षाला १९० ते २०० अंडी देते. प्रत्येक अंडे ४५ ग्रॅम वजनाचे असते. जलद वाढ - २० आठवड्यांत १८४७ ग्रॅमपर्यंत वजन वाढते. उत्तम दर्जाचे मांस - प्रथिने गुणधर्मांनी समृद्ध, चविष्ट आणि रसाळ असते. रोगप्रतिकारशक्ती - मजबूत रोगप्रतिकारशक्ती, रोगांना बळी पडत नाही. पोषण - कमी खाद्यपदार्थावरही चांगली वाढ होते. कर्ज मिळण्याचीही सुविधा : कॅरी निर्भीक कोंबडी कमी खर्चात जास्त नफा देते. यामुळे लहान शेतकरी आणि तरुण उद्योजक सहजपणे हा व्यवसाय सुरू करू शकतात. विशेष म्हणजे राज्य सरकार कुकुटपालन योजनेद्वारे कुक्कुटपालनासाठी बँक कर्ज देखील मिळण्याची सुविधा उपलब्ध आहे. ज्यामुळे ग्रामीण भागात या प्रजातीच्या कोंबडीच्या मदतीने सहज कुकुटपालन व्यवसाय करू शकतात.

# उन्हाळ्यात दुग्ध उत्पादन कमीची कारणे आणि उपाय

आजच्या काळात दुग्ध व्यवसाय हा अनेक शेतकऱ्यांचा मुख्य उत्पन्नाचा स्रोत आहे. मात्र उन्हाळा सुरू झाला की अनेक दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. वाढलेले तापमान, कडक ऊन आणि उष्ण हवामानामुळे दुग्ध जनावरांवर ताण येतो. याचा थेट परिणाम त्यांच्या आरोग्यावर आणि दूध उत्पादनावर होतो. अनेक वेळा जनावरे कमी दूध देऊ लागतात, सुस्त होतात किंवा आजारी पडतात. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढते. परंतु योग्य काळजी, संतुलित आहार आणि काही सोप्या उपाययोजना केल्यास उन्हाळ्यातही दूध उत्पादन वाढवता येते.



उन्हाळ्यात अशी घ्या पशुंची काळजी : उन्हाळ्यात सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जनावरांना थंड आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे. जनावरांच्या राहण्यासाठी सावलीची योग्य व्यवस्था असणे आवश्यक आहे. शक्य असल्यास झाडांची नैसर्गिक सावली, कडबा किंवा पत्र्याचे शेड तयार करावे. शेड उंच आणि हवेशीर असावा, जेणेकरून आत हवा खेळती राहील. छतावर पांढऱ्या रंगाचे ताडपत्री, झूल किंवा गवताच्या पेंढ्या टाकल्यास उष्णता कमी होते. दुपारच्या कडक उन्हात जनावरांना बाहेर सोडू नये आणि रात्री हवामान थंड असल्यास थोडा वेळ बाहेर सोडले तरी चालते. उन्हाळ्यात जनावरांना भरपूर आणि स्वच्छ पाणी देणे अत्यंत आवश्यक आहे. पाण्याअभावी जनावरांच्या शरीरात उष्णता वाढते आणि दूध उत्पादन घटते. त्यामुळे दिवसातून अनेक वेळा थंडगार पाणी द्यावे. दर तास-दोन तासांनी थोडे थोडे पाणी दिल्यास जनावरांचे शरीर थंड राहते आणि भूकही चांगली लागते. पाण्याबरोबरच योग्य आणि पौष्टिक खुराक देणेही तितकेच महत्वाचे आहे. हिरवा चारा उपलब्ध नसल्यास गव्हाचा भुसा, हरभऱ्याची कुट्टी, तांदळाचे कोंदण, तसेच थोड्या प्रमाणात खोबरेल तेल किंवा तेलकट खाद्य आहारात मिसळता येते. यामुळे जनावरांना आवश्यक पोषण मिळते आणि दूध वाढीस मदत होते. खाद्यात मीठ योग्य प्रमाणात दिल्यास जनावरांना जास्त पाणी प्यायची इच्छा होते, मात्र मीठ देण्याआधी पशुवैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. जनावरांची स्वच्छता राखणे ही सुद्धा दूध उत्पादनासाठी खूप महत्वाची बाब आहे. दिवसातून किमान दोन वेळा थंड पाण्याने जनावरांना आंघोळ घालावी. यामुळे शरीरातील उष्णता कमी होते, त्वचा स्वच्छ राहते आणि रोगजंतूंचा धोका कमी होतो. तसेच गोठा किंवा जनावरांची राहण्याची जागा दररोज स्वच्छ ठेवावी, ओलसर कचरा काढून टाकावा आणि दुर्गंधी होणार नाही याची काळजी घ्यावी.याशिवाय काही घरगुती आणि देशी उपाय देखील दूध वाढीसाठी उपयुक्त ठरतात. जनावरांना देशी घेरणी पाजल्यास पचन सुधारते. गुळाचे पाणी दिल्याने शरीरात ऊर्जा मिळते आणि थकवा कमी होतो. तसेच मेथीच्या दाण्यांची पावडर पशुखाद्यात मिसळून दिल्यास दूध उत्पादनात चांगली वाढ दिसून येते.

# केळीच्या बागेचे व्यवस्थापन

केळीच्या बागेत आंतरमशागत, नियमित स्वच्छता व योग्य देखभाल केल्यास उत्पादन चांगले मिळते. हवामान सतत बदलत असल्यामुळे केळीच्या बागेची योग्य काळजी घेणे खूप गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने दिलेल्या उपायांचा अवलंब केल्यास झाडांचे नुकसान कमी होऊन चांगले उत्पादन मिळवू शकतात.

आंतरमशागत : बाग नेहमी तणमुक्त ठेवावी. केळी बाग स्वच्छ ठेवण्यासाठी उभी-आडवी कुळवणी वेळेवर करावी. लागवडीनंतर ३ ते ४ महिन्यांपर्यंत कुळवणी करणे फायदेशीर ठरते. दर दोन महिन्यांनी टिचणी बांधणी करून झाडांना मातीची भर द्यावी. केळीच्या मुख्य झाडाच्या खोडाच्या बाजूने उगवणारे नवीन झाड किंवा कोंब ज्याला बोलीभाषेत पिल्ले म्हणतात, त्यांना धारदार कोयत्याने नियमित काढावीत. रोगग्रस्त पाने कापून बागेबाहेर नष्ट करावीत, पण हिरवी पाने कापू नयेत. झाडे पडू नयेत म्हणून गरजेप्रमाणे बांबूच्या काठ्या किंवा पॉलीप्रॉपीलीन पट्ट्यांनी झाडांना आधार द्यावा.



केळी घडाची गुणवत्ता वाढविण्यासाठी : घड पूर्ण निसवल्यावर केळफूल वेळीच कापावे. घडावर फक्त ८ ते ९ फण्या ठेवून खालच्या फण्या धारदार विळीने लवकर काढून टाकाव्यात. घड पूर्ण निसवल्यानंतर आणि त्यानंतर १५ दिवसांनी १० लिटर पाण्यात ५० ग्रॅम पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट, १०० ग्रॅम युरिया आणि १० मिली स्टीकर मिसळून फवारणी करावी. केळफुल कापल्यानंतर एकदा आणि त्यानंतर ३० दिवसांनी दुसऱ्यांदा १० लिटर पाण्यात २०० ग्रॅम सल्फेट ऑफ पोटॅश मिसळून फवारणी करावी. घडांवर २% ते ६% सच्छिद्रतेच्या पांढऱ्या पॉलिथीन पिशव्यांचे आवरण करावे.

आंतरपिकांबाबतीत दक्षता : केळीबागेत चवळी, उडीद, मुग, भुईमूग, काकडी, भोपळा, कलिंगड, खरबुज, मिरची आणि वांगी यांसारखी पिके घेणे टाळावे. ही पिके घेतल्यास सीएमव्ही रोग वाढण्याचा धोका वाढतो, त्यामुळे ही पिके लावू नयेत.

केळीसाठी आच्छादनाचा वापर : केळीच्या दोन ओळींमधील मोकळ्या जागेच्या सुमारे ८०% भागावर ३० मायक्रॉन जाडीचे चंदेरी रंगाचे पॉलीइथिलीनचे आच्छादन करावे. हे आच्छादन आंतरमशागत पूर्ण झाल्यानंतर म्हणजेच नोव्हेंबर महिन्यात करणे योग्य असते.

बदलत्या वातावरणात केळीचे व्यवस्थापन : बागेत साचलेले पाणी लगेच बाहेर काढावे. जर सतत पावसामुळे जमिनीतून किंवा ठिबकाने खते देणे शक्य नसेल, तर खते पाण्यात मिसळून पानांवर फवारणी करावी. जोरदार वाऱ्यामुळे केळीची पाने फाटतात आणि झाडे पडून नुकसान होते. हे नुकसान कमी करण्यासाठी बागेभोवती दोन मीटर अंतरावर कुंपण पिकाच्या दोन ओळी लागवडीच्या वेळीच लावाव्यात. कुंपण पिकासाठी शेवरी या पिकाचा वापर करावा. थंडीच्या काळात रात्री झाडांना पाणी द्यावे. सकाळी लवकर बागेत ओला पाला आणि पाचोळा जाळून धूर करावा. झाडाच्या वयानुसार २५० ग्रॅम ते १००० ग्रॅम निंबोळी ढेप प्रती झाड द्यावी. थंडीपासून घडांचे संरक्षण करण्यासाठी सहा टक्के छिद्र असलेल्या पांढऱ्या प्लास्टिकच्या पिशवीचे आवरण करावे.

अतिजास्त तापमान : उकाड्याच्या काळात झाडांना शिफारशीनुसार पुरेसे पाणी द्यावे. मातीतील ओलावा टिकवण्यासाठी बागेत केळीची पाने, गव्हाचा भुसा, ऊसाचे पाचट किंवा सोयाबीन भुसा वापरून सेंद्रिय आच्छादन करावे. एप्रिलपासून दर पंधरा दिवसांनी १० लिटर पाण्यात ८०० ग्रॅम केओलीन मिसळून केळीच्या पानांवर फवारणी करावी.इतर उपाय : लागवडीनंतर ३ ते ४ महिन्यांपर्यंत नियमित कुळवणी करून बाग स्वच्छ ठेवावी. केळीच्या घडाची गुणवत्ता वाढवण्यासाठी घडावर फक्त ८-९ फण्या ठेवून, फवारणी करून आणि पॉलिथीन आवरण लावून गुणवत्ता सुधारते. चवळी, मुग, उडीद, भुईमूग, काकडी, कलिंगड, खरबुज, मिरची, वांगी टाळावीत कारण त्या सीएमव्ही रोग वाढवतात. रोगग्रस्त पाने लगेच कापून बागेबाहेर नष्ट करावीत. नोव्हेंबर महिन्यात आंतरमशागत पूर्ण झाल्यानंतर ३० मायक्रॉन जाडीचे पॉलीइथिलीन आच्छादन करावे.




## जागतिक दिवस
## भारतीय तटरक्षक दल दिवस

### महत्वाच्या घटना

१६८९ : गणोजी शिर्के यांच्या मदतीने मुघल सरदार शेख नजीबखान याने छत्रपती संभाजी महाराजांना कैद केले.
१७९० : न्यूयोर्क मध्ये पहिल्यांदा “सुप्रीम कोर्ट ऑफ़ द यूनाइटेड स्टेट्स’ चे आयोजन केल्या गेले.
१८२७ : कोलकता येथे बंगाल क्लब ची स्थापना झाली.
१८३५ : मॉरिशसमधे गुलामगिरी प्रथेचा अंत
१८८४ : ’ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी’ची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली.
१८८४ : देशात पोस्टल विमा योजना सुरु करण्यात आली.
१८९३ : थॉमस एडिसनने पहिल्या चलचित्रपटाची निर्मिती पूर्ण केली.
१९४१ : डॉ. के. बी. लेले यांनी ’गुरुकिल्ली’ हे जादुविद्येला वाहिलेले मराठी भाषेतील पहिले नियतकालिक सुरू केले.
१९४६ : नऊ शतकांची राजसत्ता बरखास्त करुन प्रजासत्ताक बनण्यास हंगेरीच्या संसदेने मान्यता दिली.
१९५६ : सुधी रंजन दास यांनी भारताचे ५ वे सरन्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला.
१९६४ : प्र. बा. गजेन्द्रगडकर यांनी भारताचे ७ वे सरन्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला.
१९६४ : आजच्या दिवशी युनिटी ट्रस्ट ची स्थापना करण्यात आली.
१९७७ : ‘इंडियन कोस्ट गार्ड चे स्थापना करण्यात आली.
१९७७ : आजच्या दिवशी देशातील पहिले राष्ट्रीय रेल्वे संग्रहालयाची दिल्ली येथे स्थापना करण्यात आली.
१९७९ : १५ वर्षे विजनवासात काढल्यानंतर ईराणचे आयातुल्ला खोमेनी तेहरानला परतले.
१९८१ : ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडमधील एक दिवसीय क्रिकेट सामन्यात शेवटच्या चेंडुवर न्यूझीलंडला ६ धावा हव्या असताना ग्रेग चॅपलने आपला भाऊ ट्रेव्हर चॅपलला अंडरआर्म बॉल टाकण्यास सांगितले. ट्रेव्हरने चॅपलने तसा चेंडू टाकला व ऑस्ट्रेलियाने सामना जिंकला परंतु यानंतर अंडरआर्म गोलंदाजी बेकायदा ठरवण्यात आली.
१९८२ : पाकिस्तानी क्रिकेटपटू शोएब मलिक यांचा जन्म.
१९९२ : भोपाळच्या मुख्य न्यायाधीशांनी युनियन कार्बाइडचा मुख्य अधिकारी वॉरेन अँडरसन याला फरारी घोषित केले.
१९९२ : आजच्या दिवशी केंद्राशाशित प्रदेश दिल्लीला राष्ट्रीय राजधानी म्हणून दर्जा मिळाला.
१९९८ : पीटर कोरडा यांनी मार्सिलो रियोस यांना हरवून ऑस्ट्रेलिया ओपन टेनिस चॅम्पियनशिप आपल्या नावावर केली
२००२ : अमेरिकेचे प्रसिद्ध पत्रकार डेनियल पर्ल यांचे अपहरण करून त्यांची आजच्या दिवशी हत्या करण्यात आली.
२००४ : मक्का येथे चालू असलेल्या हज यात्रेत चेंगराचेंगरी होऊन २५१ यात्रेकरू ठार तर २४४ लोक जखमी झाले.
२०१३ : जागतिक बुरखा/हिजाब दिनाची स्थापना करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६४ : जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर - अमेरिकन वनस्पतीतज्ञ, शिक्षणतज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (मृत्यू: ५ जानेवारी १९४३)
१८८४ : ’विद्यानिधी’ सिद्धेश्वरशास्त्री विष्णू चित्राव महामहोपाध्याय, वैदिक साहित्याचे अभ्यासक व मराठी कोशकार (मृत्यू: ६ जानेवारी १९८४)
१९०१ : क्लार्क गेबल - अमेरिकन अभिनेता (मृत्यू: १६ नोव्हेंबर १९६०)
१९१२ : राजा बढे - संपादक, चित्रपट अभिनेते, लेखक, नाटककार, कादंबरीकार, कथाकथनकार, गायक, कवी आणि गीतकार (मृत्यू: ७ एप्रिल १९७७)
१९१४ : भारतीय प्रसिद्ध चित्रपट कलाकार अवतार किशन हंगल यांचा जन्म.
१९१५ : हैज या विषाणूवर संशोधन करणारे भारतीय शास्त्रज्ञ शंभूनाथ दे यांचा जन्म.
१९१७ : ए. के. हनगल - चित्रपट अभिनेते व स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: २६ ऑगस्ट २०१२)
१९२७ : मधुकर दत्तात्रय तथा म. द. हातकणंगलेकर - ज्येष्ठ समीक्षक आणि सांगली (२००८) येथील ८१ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे
१९२९ : जयंत साळगावकर - ज्योतिर्भास्कर, लेखक व उद्योजक (मृत्यू: २० ऑगस्ट २०१३)
१९३१ : बोरिस येलत्सिन - रशियन फेडरेशनचे पहिले अध्यक्ष (मृत्यू: २३ एप्रिल २००७)
१९५५ : प्रसिद्ध कुश्ती पैलवान सतपाल सिंह चा जन्म.
१९५६ : दक्षिणात्य चित्रपटांमध्ये काम करणारे कलाकार ब्रम्हानंद यांचा जन्म.
१९५७: बॉलीवूड चे प्रसिद्ध अभिनेते जॉकी श्रॉफ यांचा जन्म.
१९७१: अजय जडेजा - क्रिकेटपटू
१९८१: डग्लस एअरक्राफ्ट कंपनी चे संस्थापक डोनाल्ड विल्स डग्लस सिनियर यांचे निधन. (जन्म: ६ एप्रिल १८९२).

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८२ : ब्रिटीशांसाठी हिमालयाला एकस्फ्लोर करणारे भारतीय नैन सिंह रावत यांचे निधन.
१९७६ : वेर्नर हायसेनबर्ग - ’क्वांटम मॅकॅनिक्स’मधील मूलभूत संशोधनासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९३२) जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ५ डिसेंबर १९०१)
१९९५ : मोतीराम गजानन तथा मो. ग. रांगणेकर - नाटककार, चित्रपट दिग्दर्शक व पत्रकार (मृत्यू: १० एप्रिल १९०७)
२००३ : कल्पना चावला - भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर (जन्म: १ जुलै १९६१)
२०१२ : अनिल मोहिले - संगीतकार व संगीत संयोजक.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# मंठा पोलीस स्टेशनची नाटकबाजी?

## अवैध धंदे बंद करा अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोलन-उदयसिंह बोराडे

मंठा । प्रतिनिधी

मंठा पोलीस स्टेशनकडून फक्त कारवाईची नाटक बाजी सुरू असून कारवाई करण्यास पोलीस स्टेशन नापास असल्याचे यावरून दिसून येत आहेत. याप्रकरणी गृहमंत्री देवा भाऊ यांनी मंठा पोलीस स्टेशन कडे लक्ष देणे गरजेचं आहे नसता लाडक्या बहिणीचा संसार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. तसेच पोलीस अधीक्षक बंसल साहेब येणे पण लक्ष देणे गरजेचे आहे अशी मागणी सर्वसामान्यांना नागरिकाकडून करण्यात येत आहे.

तालुक्यामध्ये अवैद्य धंद्याचा सुळसुळाट पहावयास मिळत असून मंठा पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व अवैध धंदे सात दिवसात बंद न केल्यास शिवसेना स्टाईल आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी दिला आहे. पोलीस ठाण्याच्या नाकावर टिचून मटका,गुटखा, लॉटरी, क्लब जुगार, वैश्यव्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. यात पोलीस प्रशासनाचा आशीर्वाद आहे. मंठा तालुका शिवसेनेच्या वतीने ( दि.३१) रोजी सर्व शिवसैनिकांनी एकत्र येऊन पोलीस अधीक्षक कार्यालय जालना येथे पोलीस अधीक्षक बन्सल यांना निवेदनाद्वारे विनंती केली की , मंठा पोलीस स्टेशन हद्दीत खुले अवैद्य धंदे असून अवैद्य धंदे करणारे सर्वच मंडळी पोलीस स्टेशनचा आवारात दिवसभर वावर असतो. पोलीस निरीक्षक, कर्मचारी अवैध धंद्याला मदत करीत आहे.असा आरोपही शिवसेनेच्या वतीने करण्यात आला असून पोलीस प्रशासनाच्या वतीने वरिष्ठांना अवैद्य धंदे बंद असल्याचा अहवाल दिला जातो.



मटक्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील सर्व सामान्य लोकांना आर्थिक संकटामुळे आत्महत्या करण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. असे जर होत असेल तर शिवसेना या विरोधात रस्त्यावर उतरणार सात दिवसाच्या आत या धंद्याला लगाम नाही बसला तर आम्ही शिवसेना स्टाईल रस्त्यावर उतरू असा इशारा शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी पोलीस प्रशासनाला निवेदना द्वारे दिला. यावेळी उपजिल्हाप्रमुख प्रमुख योगेश गणगे, भगवान गायकवाड, तालुकाप्रमुख रामराव वरकड, उपतालुकाप्रमुख अक्षयदीप वाघमारे, योगेश पाटील अवचार शिवसेना महिला आघाडी प्रमुख सुनितातार्इ देशमुख, कासाबाई शिरगुळे यांच्यासह तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी यांची उपस्थिती होती. निवेदनाच्या प्रती गृहराज्यमंत्री योगेश कदम, पोलीस महासंचालक मुंबई, विशेष पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात आले आहेत. दारू मटका वेश्या गुटखा या व्यसन मुळे आमिषाला बळी पडून शेतकरी कष्टकरी आणि तरुण वर्ग बरबाद होण्याच्या मार्गावर येण्याची शक्यता आहे. कर्जबाजारीपण अनेक कुटुंबं कर्जबाजारी झाली असून घरातील कमावती माणसे जुगारात पैसे उडवत असल्याने महिला व मुलांवर उपासमारीची वेळ आली आहे. प्रशासकीय सुस्ती ज्या ठिकाणी हा अवैध व्यवसाय चालतो तिथूनच पोलिसांच्या गाड्या अनेकदा ये-जा करतात. मग तरीही या अड्?ड्यांवर कारवाई का होत नाही? हा सर्वात मोठा प्रश्न आहे. गजबजलेल्या बसस्थानक परिसरात पोलीस गस्त नेमकी कुठे असते? तथाकथित मटका किंग . वाळू गुटखा वेश्या अड्डा यांना स्थानिक पोलिसांचे अभय आहे का ? वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाची दखल घेऊन कारवाईचा बडगा उगारणार की चिरीमिरी वर समाधान मानणार ? शहरात कायद्याचे राज्य आहे की जुगार माफियांचे ? असा प्रश्न जनतेतून उपस्थित होत आहे. जर त्वरित कारवाई झाली नाही तर सर्वसामान्यांच्या संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आता लक्ष फक्त वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जिल्हा पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय अधिकारी पोलीस अधिकारी यांनी स्वतः गंभीर विषयात लक्ष घालून कायमस्वरूपी अवैध धंदे बंद करण्यात यावे.

## जिल्हा परिषद निवडणुकिसाठी पंधराशे अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती

संभाजीनगर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे दुसरे प्रशिक्षण शुक्रवारी (दि. ३०) झाले. या प्रशिक्षणामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या एकूण १५०० अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सिल्लोड येथे जळगाव रोडवरील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे शुक्रवारी सकाळी प्रशिक्षण पार पडले. हे प्रशिक्षण निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. नीलेश अपार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांपैकी हजर १ हजार ४०६ मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना निवडणूक प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षकांनी ईव्हीएम हाताळणी, मतदान प्रक्रिया, मतमोजणीपूर्व तयारी याबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. यावेळी द्वारे सादरीकरण करण्यात आले असून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शंका व समस्यांचे निराकरणही करण्यात आले. प्रशिक्षणास अनुपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारणे दाखवा नोटीस बजावून फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. नीलेश अपार यांनी दिला.

## मुकुंदवाडीत झोपलेल्या वृद्धांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मुकुंदवाडी परिसरातील गेट नं. ५६ जवळ एका मद्यधुंद तरुणाने दुकानात झोपलेल्या दोन वृद्धांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या जीवघेण्या हल्ल्यात आरोपीने वृद्धांच्या अंथरुणाला आग लावली आणि दुकानातील रोकडसह मोबाईल लंपास केला. संदीप इंगळे असे आरोपीचे नाव आहे.

फिर्यादी सुभाष भाऊराव निकाळजे (७५) हे २६ जानेवारी रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास वाल्मीक आश्रम परिसरातील शशिकांत शिंगणे यांच्या दुकानाजवळ बसले होते. यावेळी ओळखीचा असलेला आरोपी संदीप इंगळे हा दारूच्या नशेत तिथे आला आणि त्याने वृद्धांना विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.



वाद वाढू नये म्हणून निकाळजे आणि शिंगणे तिथून दुसऱ्या दुकानावर निघून गेले, मात्र आरोपीने तिथेही येऊन त्यांना तुम्हाला थोड्या वेळात बघून घेतो, अशी धमकी दिली. मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास, जेव्हा निकाळजे आणि शिंगणे हे दुकानाचे शटर ओढून आत झोपले होते, तेव्हा आरोपी संदीप इंगळे याने शटर उघडून आत प्रवेश केला. त्याने शिंगणे यांचा १३ हजारांचा मोबाईल आणि गल्ल्यातील अडीच हजार रुपयांची रोकड चोरली. इतक्यावरच न थांबता, दोन्ही वृद्ध झोपेत असताना आरोपीने त्यांच्या अंथरुणाला आग लावून दिली. आगीचे चटके बसल्याने निकाळजे यांना जाग आली, तेव्हा त्यांना आरोपी पळून जाताना दिसला. या घटनेनंतर जखमी वृद्धांवर घाटी रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यानंतर मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक प्रशांत पासलकर करत आहेत.

## मुलांनी केली बापाच्या घरी चोरी

अंबड । प्रतिनिधी

शेतात कामासाठी गेल्यानंतर आपल्या मुलानेच घराचा कुलुप लावलेला कडी कोंडा तोडून घरातून रोख दिड लाख रुपये व दिड ग्रॅमचे सोन्याचे कानातील फुल चोरले असल्याची तक्रार बापाने अंबड पोलिस ठाण्यात दिली. सदरील प्रकार घनसावंगी तालुक्यातील राणी उंचेगाव येथे घडला आहे. यासंदर्भात अधिक माहिती अशी की, राणी उंचेगाव येथील सोनाजी बाबासाहेब शिंगटे (वय ६०) यांना उद्धव शिंगटे व विष्णु शिंगटे असे दोन मुले असून मोठा मुलगा उद्धव याचे लग्न झालेले असून, तो पत्नीसह वडिलांच्या घराच्या बाजुलाच घर बांधुन राहतो तर लहान मुलगा विष्णु हा कामानिमीत मध्यप्रदेशात आहे. पत्नी मयत झाल्याने सोनाजी शिंगटे हे एकटेच त्यांच्या घरी राहतात व शेती व्यवसाय करतात. मोठा मुलगा नेहमी भांडण करतो.

त्यामुळे ते त्याला बोलत नाहीत. दरम्यान १२ जानेवारी रोजी सकाळी घराला कुलुप लावुन शेतात कामासाठी गेले व कामे करून संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास परत आले. तेव्हा घराचा कडी कोंडा हा हा तुटलेले दिसला व घरात जावुन पाही पाहीले असता जर्मनच्या डब्यात व कॅटलीत ठेवलेले रोख दीड लाख रुपये व १.५ ग्रॅमचे सोन्याचे कानातील फुल चोरीस गेल्याचे दिसले.


घरातील कुठलेच सामान अस्त व्यस्त पडलेले नव्हते. याबाबत ते पैसे मुलास विचारण्यास गेले असता तो खालीवर बोलला. अगोदरसुद्धा उद्धवने घरातील पैसे ब-याच वेळेस चोरले होते. परंतु तो आपलाच मुलगा असल्यामुळे वडिलांनी कोणाला काही सांगितले नव्हते. आपल्याकडे दीड लाख रुपये आहेत हे उद्धवला माहीत होते, त्यानेच घराचा कडी कोंडा तोडून दिड लाख रुपये व दिड ग्रॅम सोन्याचे फुल चोरले आहे. या आशयाच्या वडिलांच्या फिर्यादीवरून अंबड पोलिस ठाण्यात मुलगा उद्धव शिंगटे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## सेलूत ८.४३ किलो गांजा जप्त; एकावर गुन्हा

परभणी । प्रतिनिधी

जिल्ह्यात अमली पदार्थांच्या अवैध व्यापारा विरोधात सुरू असलेल्या मोहिमेत पोलिसांना मोठे यश मिळाले. सेलू शहरातील राजीव गांधी नगर परिसरात छापा टाकून पोलिसांनी तब्बल ८ किलो ४३२ ग्रॅम गांजा जप्त केला, याप्रकरणी एका आरोपी विरोधात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात अवैध धंदे, अमली पदार्थ विक्री व तस्करी रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा व सेलू ठाण्याचे पथक गस्त घालत होते. दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहिती आधारे सेलू येथील राजीव गांधी नगर परिसरात राहणाऱ्या शेख कौसर शेख अमीर (वय ६०) यांच्या घरावर छापा टाकण्यात आला. यावेळी त्या घराची झडती घेतली असता घरातून एकूण ८ किलो ४३२ ग्रॅम गांजा आढळला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे बाजार किंमत १ लाख ६८ हजार ६४० रुपये इतकी आहे. सदर मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. या कारवाई दरम्यान गटविकास अधिकारी उदय भोसले तसेच पोलिस निरीक्षक दीपक बोरसे उपस्थित होते. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार यांच्या फिर्यादीवरून सेलू पोलिस ठाण्यात शेख कौसर शेख अमीर यांच्याविरोधात



एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी गांजा कुठून आणत होता व त्याची विक्री कोणाला केली जात होती, याबाबत पोलिस तपास करीत आहेत. सदर कारवाई पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या आदेशान्वये तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. कारवाईत पोलिस उपनिरीक्षक गणेश पवार, अंमलदार विलास सातपुते, मधुकर ढवळे, उमेश चव्हाण, चाटे, दुबे, पोळ, हनवते तसेच महिला पोलिस कर्मचारी सारंग यांनी सहभाग घेतला. जिल्ह्यात अमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या कारवाईमुळे तस्करांत खळबळ उडाली असून, पुढील काळात अशाच धडक कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## मायलेक उपक्रम उत्साहात; मुली असलेल्या जन्मदात्यांचा सन्मान

लातूर । प्रतिनिधी

लातूर येथील सूळ हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आलेला मायलेक उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात मुलींचे सक्षमीकरण, आत्मविश्वास वृद्धी तसेच सुरक्षित व सन्मानपूर्ण वातावरण निर्मितीवर भर देण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी मुलींना योग्य संधी व शिक्षण मिळाल्यास त्या समाजाच्या विकासात मोलाची भूमिका बजावतात, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमप्रसंगी केवळ मुली असलेल्या कुटुंबातील महिला पालकांचा सत्कार करण्यात आला. या उपक्रमामुळे उपस्थित महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ. अभय कदम यांनी मुलींच्या शारीरिक व मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन करत पालक व समाजाची जबाबदारी स्पष्ट केली. तर डॉ. ज्योती राहुल सूळ यांनी मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकास, आत्मसन्मान व भविष्यातील संधी यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास दोन मुली असलेल्या पालकांचा, विशेषतः महिलांचा, मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सूळ हॉस्पिटलमध्ये केवळ मुली असलेल्या दाम्पत्यांचे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच महिलांसाठी शिवणकाम, ब्युटी पार्लर, हेल्थ सर्व्हिसेस व संगणक प्रशिक्षण अभ्यासक्रम तसेच मुलींना पूर्वप्राथमिक शैक्षणिक मदत दिली जाणार आहे. वीरमाता व वीरपत्नी यांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## चार डॉल्बी-डीजे वाहनांना तब्बल ४० लाखांचा दंड

धाराशिव । प्रतिनिधी

सार्वजनिक व वैयक्तिक कार्यक्रमांमध्ये डॉल्बी-डीजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे वाढत चाललेल्या ध्वनी व पर्यावरण प्रदूषणाविरोधात धाराशिव पोलिसांनी कडक कारवाई केली आहे. शहरातील चार डॉल्बी-डीजे वाहनांवर तब्बल ४० लाख रुपयांची हमी रक्षण रक्कम तर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून ७४ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

हजरत खॉजा शमशोद्दीन गाजी (रहे) यांच्या उरुसानिमित्त धाराशिव शहरात डॉल्बी डीजे लावण्यात आले होते. मात्र ठरवून दिलेल्या ध्वनी मर्यादेपेक्षा अधिक आवाज करण्यात आल्याने संपूर्ण शहरात दणदणाट झाला. त्यामुळे धाराशिव शहर पोलिस ठाण्याने कारवाई करत संबंधित डॉल्बी, साऊंड सिस्टिम व वाहने ताब्यात घेतली. या कारवाईत प्रणव राजेंद्र



तांबे (रा. सातारा), सौरभ सुरेश खामकर (रा. शिरूर, पुणे), गणेश रामदास मिरगी (रा. सातारा), संतोष किसन मेघावत (रा. पुणे), तसेच साऊंड सिस्टिम चालक सागर संभाजी शिंदे (रा. कोल्हापूर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या सर्व वाहनांना दंड आकारण्यात आला आहे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयाने प्रत्येकी १० लाख रुपये अशी एकूण ४० लाख रुपयांच्या हमी रक्षणावर व कडक अटींसह वाहने तात्पुरती सोडण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये डॉल्बी-डीजे व वाहने विक्री, बदल किंवा बेकायदेशीर वापरास मनाई करण्यात आली आहे. आरटीओ कार्यालयाने चारही वाहनांवर एकूण ७४ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक रितू खोखर, अप्पर पोलिस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक कुमार दराडे यांच्या पथकाने केली. या कारवाईमुळे डॉल्बी-डीजेविरोधात कडक संदेश गेला असून शहर डॉल्बीमुक्त होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, पोलिसांनी केलेल्या कारवाईचे पर्यावरणप्रेमीतून स्वागत होत आहे. पोलिसांनी या कारवाईत सातत्य ठेवावे, अशी भावना यातून व्यक्त होत आहे. आता महापुरुषांची जयंती, उत्सव, लग्नसोहळे आदींसाठी डॉल्बीचा वापर होणार आहे. त्यामुळे पोलिसांनी कारवाई सातत्य ठेवण्याची मागणी होऊ लागली आहे.

# ३०५ एकर क्षेत्रात फळबाग लागवड कार्यक्रम

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढविण्याच्या उपक्रमांना शासन प्रोत्साहन देत आहे. शासनाच्या शाश्वत व दीर्घकालीन उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण व्हावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध योजना राज्यात लागू केल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला विविध माध्यमातून प्रतिसाद प्राप्त झाला आहे. असाच एक शाश्वत उत्पादन देणारा फळबागेचा पथदर्शी प्रकल्प बीड जिल्ह्यात ३५० एकर क्षेत्रावर येत्या काळात साकारणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनानुसार हरित वृक्षलागवड वाढवून शेतकऱ्यांना बळकटी देण्यासोबतच पर्यावरणीय समतोल राखण्या साठी हर्बालाईफ कंपनीने सामाजिक बांधिलकी उत्तरदायित्व अंतर्गत पुढाकार घेतला असून याला फामर्स फॉर फॉरेस्ट या संस्थेने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या अंतर्गत जिल्हयात पडीक जमीन विकास तसेच वृक्ष लागवड आणि संवर्धन यासाठी ३०५ एकर वर फळबाग व देशी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. यासाठी १.५ कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे. याबाबत हर्बालाइफ (कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व निधी) आणि फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांच्यात सहकार्य करार नुकताच झाला. पर्यावरणाचा समतोल राखणे तसेच शेतकऱ्यांचे शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढवणे ही सद्यस्थितीत अत्यंत महत्त्वाची बाब ठरत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने विविध पर्यावरणपूरक व शाश्वत शेतीविषयक उपक्रम सुरू केले आहेत. या प्रयत्नांना बळ देण्यासाठी, अधिकाधिक शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा, शेतीतून मिळणारा मोबदला वाढावा, दीर्घकालीन शाश्वत उत्पन्नाचा स्रोत निर्माण व्हावा आणि त्यासोबत पर्यावरण संरक्षणालाही चालना मिळावी, या उद्देशाने हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत बीड आणि पुणे जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या पडीक, कमी कस व शेतजमिनींवर वृक्षलागवड व संवर्धनाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये आंबा, लिंबू, संत्रा, मोसंबी, आवळा, जांभूळ, चिंच यांसह विविध प्रकारची उत्तम कलम केलेली फळझाडे तसेच अनेक देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. तसेच बागेचे योग्य व्यवस्थापन करून विविध प्रकारची आंतरपीके घेऊ शकतात.

लागवड झालेल्या झाडांची देखरेख व वाढ नोंद करण्यासाठी ड्रोनद्वारे छायाचित्रे, उपग्रह डेटा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता चा वापर करून डिजिटल निरीक्षण प्रणाली राबवली जाणार आहे. माती परीक्षण तसेच फळबाग लागवडीच्या विविध टप्प्यांवर घ्यावयाच्या आवश्यक काळजीविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वेगवेगळ्या वेळेला डिजिटल कार्यशाळा आयोजित केल्या जातील. यासोबतच विविध माध्यमांचा वापर करून सातत्यपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन आणि माहिती पुरवली जाणार आहे.

यासोबतच हा उपक्रम मातीची सुपीकता वाढविणे, कार्बन शोषण वाढविणे आणि स्थानिक जैवविविधतेचे संरक्षण करणे यासाठीही उपयुक्त ठरणार आहे. सदरील फळबागा भविष्यात कार्बन क्रेडिट मार्केटशी संलग्न करण्यात येणार असून, फळ उत्पादनातून मिळणाऱ्या उत्पन्नासोबतच कार्बन क्रेडिटच्या माध्यमातूनही अतिरिक्त उत्पन्नाचा पर्यायी स्रोत उपलब्ध होईल. तसेच ग्रामीण भागात हरित रोजगाराच्या संधी निर्माण होतील. हा उपक्रम पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत शेती विकासासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## धावत्या रेल्वेतून पडून महिलेचा मृत्यू तर एक गंभीर जखमी

परभणी । प्रतिनिधी

पूर्णा तालुक्यातील फुकटगाव शिवारात पनवेल एक्स्प्रेस रेल्वे डब्यातून पडून एका ३२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. तर तिच्या सोबत असलेला एक युवक देखील पडून गंभीर जखमी झाला असल्याची घटना घडली आहे. भाग्यश्री अमोल देवतळे (वय ३२ वर्ष, रा. असोली, ता. माहूर, जि. नांदेड) असे मयत महिलेचे नाव आहे. तर मिथून रमेश गवळी रा. असोली असे जखमी युवकाचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नांदेड जिल्ह्यातील माहूर तालूका असोली येथील मयत महिला भाग्यश्री देवतळे, पती अमोल वसंत देवतळे, मिथून गवळी हे तिघे (दि. ३० जानेवारी) पनवेल एक्स्प्रेस रेल्वेमधून नांदेडकडे येत होते. सदरील रेल्वे एक्स्प्रेस फुकटगाव शिवारात येताच मयत महिला लघूशंका करण्यासाठी बाथरुमकडे गेली असता तिचा तोल जावून दरवाज्यातून ती रेल्वेखाली पडली. दरम्यान रेल्वेखाली येवून तिचा



जागीच मृत्यू झाला.

सदर महिलेसह सोबतचा मिथुन गवळी हा धावत्या रेल्वेतून पडून जखमी झाल्याची माहिती मयत महिलेचा पती अमोल यांनी प्रस्तुत प्रतिनिधीस बोलताना दिली. दरम्यान, सदरील घटनेची माहिती मिळताच पूर्णा पोलीस ठाण्याचे एपीआय गजानन पाटील,सपोउनि रमेश मुलेमुले,पोशि स्वाती धबडे, दक्षता कमटी सदस्य संघमित्राताई जोंधळे यांनी भेट देत पंचनामा केला. शासकीय ग्रामीण रुग्णालयात दुपारी शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सदर महिलेस एक १४ वर्षाची मुलगी तर १० वर्षाचा मुलगा आहे.

# दासखेडमध्ये बेकायदेशीर मुरूम उत्खननावर महसूल विभागाची धडक कारवाई

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील हिवर शिंगापांचंगी रस्त्याच्या कामासाठी दासखेड शिवारात सुरू असलेल्या बेकायदेशीर मुरूम उत्खननावर महसूल विभागाने धडक कारवाई केली आहे. कोणतीही शासकीय परवानगी न घेता सुरू असलेले हे उत्खनन दासखेड मंडळाचे मंडळ अधिकारी बाळकृष्ण तोगे यांनी तात्काळ बंद पाडत संबंधित यंत्रसामग्री जप्त केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हिवर शिंगा ते पांचंगी या रस्त्याच्या कामासाठी दासखेड येथील शेतकऱ्यांच्या शेतातून मोठ्या प्रमाणावर मुरूम उचलण्यात येत होता. या उत्खननासाठी महसूल विभागाची कोणतीही पूर्वपरवानगी तसेच रॉयल्टी भरलेली नसल्याचे तपासात निष्पन्न झाले. माने कन्स्ट्रक्शन यांच्यामार्फत हे काम सुरू असल्याचे समोर आले आहे.




या बेकायदेशीर उत्खननाची माहिती मिळताच मंडळ अधिकारी बाळकृष्ण तोगे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन कारवाई केली. यावेळी उत्खननासाठी कंपनीचा हायवा ( २३ २५७३) एक पोकलेन मशीन वापरात असल्याचे आढळून आले. सदर यंत्रसामग्री महसूल विभागाने ताब्यात घेतली असून काम तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासंदर्भात मंडळ अधिकारी बाळकृष्ण तोगे यांनी सांगितले की, ''शासकीय नियमांचे उल्लंघन करून, कोणतीही रीतसर परवानगी व रॉयल्टी न भरता मुरूम उत्खनन करणे बेकायदेशीर आहे. संबंधितांना काम बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून योग्य परवानगी घेतल्याशिवाय काम सुरू करू नये, अशी सक्त ताकीद देण्यात आली आहे.''

या कारवाईमुळे शासकीय महसूल बुडवणाऱ्या बेकायदेशीर उत्खननाला आळा बसला असून ग्रामस्थ व पर्यावरणप्रेमींनी समाधान व्यक्त केले आहे. संबंधित ठेकेदारावर किती दंड आकारला जाणार आणि पुढील कायदेशीर कारवाई काय होणार, याकडे संपूर्ण पाटोदा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## इंडियन मेडिकल असोसिएशन योगेश्वरी शाखा,अंबाजोगाईचा आज पदग्रहण सोहळा

### अध्यक्ष डॉ.राहुल धाकडे, सचिव डॉ.उध्दव शिंदे यांची माहिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**इंडियन मेडिकल असोसिएशन योगेश्वरी शाखा, अंबाजोगाईचा आज रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी पदग्रहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती अध्यक्ष डॉ.राहुल धाकडे यांनी दिली आहे.**

शहरातील हॉटेल पियुष ईन, मुख्य रस्ता, अंबाजोगाई या ठिकाणी आज रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी, सायंकाळी ६.३० वाजता इंडियन मेडिकल असोसिएशन योगेश्वरी शाखा, अंबाजोगाई यांचा पदग्रहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून डॉ.संतोष कुलकर्णी (अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य.) तर सन्माननीय अतिथी म्हणून नंदकिशोर मुंदडा (नगराध्यक्ष, नगरपरिषद, अंबाजोगाई.), डॉ.शंकरराव धापटे (अधिष्ठाता, स्वा.रा.ती. महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई.), डॉ.रमेश भराटे (अध्यक्ष, स्थायी समिती, आयएमए, मुख्यालय.) आणि डॉ.राजेश इंगोले (अध्यक्ष, सांस्कृतिक समिती, आयएमए, महाराष्ट्र राज्य.) तर विशेष निमंत्रित म्हणून डॉ.अनंत मुळे (अध्यक्ष, आयएमए, बीड.), डॉ.सत्यप्रेम वारे (अध्यक्ष, आयएमए, कळंब.), डॉ.अभय कदम (अध्यक्ष, आयएमए, लातूर.), डॉ.श्यामसुंदर काकानी (अध्यक्ष, आयएमए, माजलगाव.), डॉ.अजित केंद्रे (अध्यक्ष, आयएमए, परळी.), डॉ.दिनकर राऊत (अध्यक्ष, आयएमए, केज.) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आय.एम.ए. पुरुष तसेच महिला शाखा संघटना यांनी पुढाकार घेतला आहे.

## भरदिवसा तरूणाची गळा चिरून हत्या

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यात एका पाठोपाठ एक घटना समोर येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील हनुमंत पिंपरी शिवारात एका २५ वर्षीय तरुणाची गळा चिरून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी तातडीने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता तपासाला वेग वाढवत एका संशयिताला बेड्या ठोकल्या.



या प्रकरणात मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार, केवड आणि हनुमंत पिंपरीच्या शिवारात एका युवकाचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आला. यावेळी नागरिकांनी पाहणी केली असता विक्की उर्फ आण्णा रावसाहेब चंदनशिव (वय २५ वर्ष) असे मृत तरुणाचे नाव असल्याचे समोर आले. विक्कीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पाहून असे लक्षात आले की अज्ञात हल्खोराने विक्कीच्या गळ्यावर तीक्ष्ण हत्याराने वार केले होते. जखम खोल असल्याने मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला असल्याचे समोर येत आहे सकाळी साडे दहाच्या सुमारास ही घटना ग्रामस्थांच्या निर्दशनास आली आल्यामुळे खरा प्रकार समोर आला आहे. आणि या घटनेमुळे संबंध केज तालुक्यात आता एकच खळबळ उडाली आहे.

या बाबद घटनेची माहिती मिळताच केज येथील पोलीस दलासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यामध्ये अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटेश देशपांडे, पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे व महेश क्षीरसागर, पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम, इनामदार आणि अशोक सोनवणे यांनी घटनास्थळाचा तत्काळ पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे या अनुषंगाने तपास वेगाने सुरू केला असल्याचे संबंधित पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत तत्परता दाखवत महेश चंदनशिव नावाच्या संशयित आरोपीला काही वेळातच ताब्यात घेतले आहे. अद्याप घटनेचे नेमके कारण समोर येऊ शकले नाही मात्र हा खून जुन्या वादातून झाला की अन्य काही कारणातून, याचा तपास पोलीस करत आहेत. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जिल्हा पोलीस अधीक्षकांचा पत्रकारांसोबत मुक्त संवाद

दिंद्रुड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिंद्रुड पत्रकारांशी शनिवारी मुक्त संवाद साधला. जिल्ह्यातील गुन्हेगारी व त्याची कारणे त्याचप्रमाणे दिंद्रुड पोलीस हद्दीतील गुन्हेगारी याबाबत बोलताना दिंद्रुड पोलीस गुन्हेगारी रोखण्यात यशस्वी झाल्याबाबत समाधान असल्याचे त्यांनी म्हटले.

शनिवारी येथील पोलीस स्टेशनला जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व अतिरिक्त बीड जिल्हा पोलीस अधीक्षक आयपीएस राहुल कुमार यांनी अचानक भेट दिली.यावेळी दिंद्रुड पत्रकार संघाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. येथील पोलीस हद्दीतील गुन्हेगारी रोखण्यात दिंद्रुड पोलिसांना यश मिळत असून सपोनि महादेव ढाकणे यांच्या कर्तव्य तत्परतेबाबत पोलीस अधीक्षकांनी यावेळी समाधान व्यक्त केले. तसेच पोलिसांच्या कामकाजाबाबत आपल्या काही तक्रारी अथवा सूचना असतील तर थेट माझ्याशी संपर्क साधावा त्यात नक्कीच बदल करण्यात येतील अशी ग्वाही यावेळी कॉवत यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. दिंद्रुड पत्रकार संघाचे जेष्ठ पत्रकार बंडुजी खांडेकर, अध्यक्ष अमोल ठोंबरे सह पत्रकार संतोष स्वामी, नागेश वक्रे, नवनाथ कांबळे, नितीन वाघमोडे, बाबा देशमाने, गणेश काटकर, एकनाथ हंगरगे यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व आयपीएस राहुल कुमार यांचे स्वागत केले.



## नियतीने केलेल्या अपघाताने महाराष्ट्रासह बीड जिल्ह्याचे अपरिमित नुकसान –शंकरराव जगताप

जवळा । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या अपघाती अकाली निधनाने राज्यासह बीड जिल्ह्याचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले असे उदगार, शंकरराव जगताप यांनी अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहताना काढले.

जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात श्रद्धांजली कार्यक्रमात बोलतांना जगताप यांनी अजितदादा पवार यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाबाबत भाष्य करतांना त्यांच्या वक्तशीरपणा, प्रशासनावरील पकड तसेच विकास कामा बाबत दर्जेदारपणाचा कमालीचा



शिस्तबद्धपणा या गोष्टी कधीही न विसरता येणाऱ्या आहेत. अजितदादानी बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची सूत्र हाती घेतल्यानंतर विकासासाठी अभूतपूर्व योजना अखल्या होत्या आणि एक वर्षाच्या कालखंडात या सर्व विकासकामानां प्रत्यक्ष सुरवात सुद्धा झाली होती परंतु नियतीने दादांना आपल्यातून हिरावून घेऊन बीड जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेला खीळ घातली आहे.बीडची बारामती करण्याची सुसंधी आता पुन्हा बीडकरांना मिळेल की नाही याचे उत्तर आता काळाच्या उदरात दडले आहे असे जगताप म्हणाले. याच कार्यक्रमात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिना निमित्त त्यांच्या प्रतिमेलाही अभिवादन केले गेले.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गोविंद महाराज नाईकवाडे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील सहाव्या पुण्यतिथी माघ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे ह.भ.प. रामायणाचार्य गोविंद महाराज नाईकवाडे (खेर्डा) यांचे रविवार दि. १ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांनी केले आहे. समस्त गावकरी मंडळी मन्यारवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी ८ वाजता सुरू होईल, गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भागिरी पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## अजित दादा.. लाडक्या बहिणींना धोका दिलात, बहिणींचं स्वप्न अपूर्ण सोडून गेलात !

### वडवणीच्या नगराध्यक्षा सौ. वंदनाताई जगताप यांची भावनिक श्रध्दांजली

वडवणी । प्रतिनिधी

समस्तमहाराष्ट्राच्या राजकारणात बहिणींसाठी आधारस्तंभ ठरलेले, सर्वसामान्य जनतेचे नेतृत्व करणारे, व ज्यांना हक्काचा व कामाचा माणुस म्हणून महाराष्ट्राने उपाधी दिली असे आपले उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार दोन दिवसांपूर्वी अचानकपणे सर्वांच्या मनाला चटका लावून अचानक आपल्यातून निघून गेले. या कधीही भरुन न निघाणाऱ्या दुःखाने संपूर्ण महाराष्ट्र हादरुन गेला असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या



कार्यकर्त्यांसह लाखो बहिणींच्या डोळ्यांत अश्रू तरळत आहेत. वडवणी येथील नगराध्यक्षा सौ.वंदनाताई शेषेराव जगताप यांनी आपल्या मनावर जड दगड ठेवून अत्यंत भावनिक शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.

त्या म्हणाल्या की, लाडक्या बहिणींना आपण धोका दिलात अजितदादा, बहिणींचं स्वप्न अपूर्ण सोडून गेलात. नगराध्यक्षा वंदनाताई जगताप यांनी दादांबरोबरच्या आठवणींना



## श्री विश्वकर्मा जयंती साजरी

घाटनांदुर । प्रतिनिधी

येथे सृष्टीचे निर्माते विराट श्री विश्वकर्मा यांच्या जयंतीनिमित्त सुतार समाज व विराट विश्वकर्मा प्रतिष्ठान घाटनांदुर यांच्यावतीने दि.३१ जानेवारी रोजी सकाळी १० वा विश्वकर्मा मंदिर सभागृह या ठिकाणी विराट श्री विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण व श्रीफळ फोडून अभिवादन करून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सरपंच महेश गारठे,मा.जि.प.सदस्य दत्ता जाधव,हनुमंत महाराज पांचाळ, नरसिंग

## संत गुरु रविदास व संत कंकैय्या महाराज सार्वजनिक जयंती महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित रहा– हरिभाऊ सवणे

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरामध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संत रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज यांच्या जयंतीचे आयोजन ०१ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक माजलगाव ठिकानी कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार प्रकाश दादा सोळंके उद्घाटक मोहन दादा जगताप यांच्या हस्ते येथे संत रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात येणार आहे तरी या जयंती महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव तथा जयंती अध्यक्ष हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.



माजलगाव शहरांमध्ये गेल्या काही दिवसापूर्वी समाजाची बैठक घेऊन सर्व समाज बधवांनी एकच जयंती साजरी करावी असे या बैठकीदरम्यान ठरवले व या जयंती मध्ये डीजे न लावता प्रतिमेला पुष्पहार घालून महाप्रसादाचे आयोजन करण्याचे ठरवले आहे. या जयंती महोत्सवास प्रमुख उपस्थिती म्हणून मा. आ.मोहनराव सोळंके, ओमप्रकाश शेटे, बाबुराव पोटभरे, जयसिंह सोळंके, सहाल चाऊस, मिलिंद आव्हाड,फरहीन शिफा चाऊस,नितीनराव नाईकनवरे, शिवाजीराव रांजवण, अच्युतराव लाटे, ज्ञानेश्वर मेंडके, जयदत्त नरवडे, माधव निर्मळ, कल्याण आबुज, श्रीहरी मोरे, संभाजी शेजुळ यांची उपस्थिती राहणार आहे तरी या भव्य दिव्य अशा सार्वजनिक जयंती महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती अध्यक्ष तथा बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांच्यासह जयंतीचे मार्गदर्शक,आयोजक,निमंत्रक व सर्व जयंती कमिटी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महासांगवी येथे श्री क्षेत्र मीराबाई साहेब संस्थानचा २८ वा पुण्यतिथी सोहळा उत्साहात

### राधाताई महाराज आईसाहेब यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

पाटोदा । प्रतिनिधी

येथील प्रसिद्ध धार्मिक स्थळ श्री क्षेत्र मीराबाई साहेब संस्थान येथे २८ वा पुण्यतिथी सप्ताह सोहळा अत्यंत भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सप्ताह सोहळ्याची सांगता ह.भ.प. राधाताई महाराज आईसाहेब यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी हजारो भाविकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण महासांगवी परिसर भक्तीरसात न्हालेला दिसून आला.

‘साधू-संत हेच कलियुगाचे आधार’

आपल्या रसाळ व प्रेरणादायी कीर्तनातून मार्गदर्शन करताना राधाताई महाराज आईसाहेब म्हणाल्या की, ''कलियुगात साधू-संतांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांचे वैराग्य व महानता मानवी जीवनाला योग्य दिशा देणारी ठरते. संतांना कोणतीही जात नसून ते केवळ मानवतेचे कल्याण पाहतात.''

त्या पुढे म्हणाल्या, ''पूर्वी संतांना मंदिरात प्रवेश नव्हता; तरीही त्यांनी आपल्या निखळ भक्तीने देवाला प्रसन्न केले. समाज सुधारण्यासाठी वाचन अत्यंत आवश्यक आहे. पुस्तक वाचले तर मस्तक सुधारते आणि विचार प्रगल्भ होतात.''

नैतिकतेचा संदेश

कीर्तनातून प्रबोधन करताना त्यांनी भाविकांना कधीही कुणाचे हक्क हिरावून घेऊ नयेत किंवा अन्याय करू नये, असा मोलाचा संदेश दिला. प्रामाणिकपणे जगणे हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. संत मीराबाई साहेब यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी सांगितले की, ''मीराबाई साहेब अत्यंत पुण्यवान होत्या. त्यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली आहे.''

भव्य मिरवणूक व महाप्रसाद

सकाळी ११ ते १ या वेळेत रंगलेल्या कीर्तन सेवेनंतर राधाताई महाराज आईसाहेब यांची वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. टाळ-मृदंगाच्या गजरात व ‘मीराबाई साहेब की जय’च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या संख्येने



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दादा मला माफ करा!

## पहाडासारखा कट्टर विरोधक अजितदादांसाठी रडला; महेश लांडगेंनी ४० सेकंदात मंच सोडला

**पिंपरी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पिंपरीमध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपचे नेते आणि आमदार महेश लांडगे (चरहशीह ङरपवसश) यांनी महानगरपालिका निवडणुकीवेळी झालेल्या आरोप प्रत्यारोपावरून अजित पवारांची माफी मागितली. हा दिवस जड अंतकरणाचा आहे. अजितदादा मला माफ करा, अशा शब्दांत महेश लांडगे यांनी माफी मागितली आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत अजित पवार आणि महेश लांडगे यांच्यात मोठ्या प्रमाणात आरोप-प्रत्यारोप झाले होते. अजित पवार यांच्या निधनानंतर आमदार लांडगे यांनी त्यांची माफी मागितली आहे. चिंचवड येथे अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्व पक्षीय, सामाजिक संघटना, संस्था यांच्यावतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी लांडगे बोलत होते. महानगरपालिकेत भाजपच्या मोठ्या प्रमाणात जागा पिंपरी चिंचवडमध्ये निवडून आल्या. परंतु महानगरपालिकांच्या निवडणूक निकालानंतर पंधरा दिवसांतच अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने पिंपरी चिंचवड शहराचा विकास करण्यात मोठा वाटा असलेल्या अजित पवारांच्या जाण्याने शोक व्यक्त केला जात आहे. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहताना महेश लांडगे देखील अत्यंत भावुक झाल्याचे दिसून आले. दादा मला माफ करा, असे म्हणत त्यांनी श्रद्धांजली वाहिली. अजित पवारांवर केलेली टीका आणि एकेरी उल्लेख त्यांच्या जिव्हारी लागला होता. तो मोठा नेता आहे, माझा एकेरी उल्लेख करणारच, असे म्हणत अजित पवार यांनी महेश लांडगे यांच्या टीकेला उत्तर दिले होते. पिंपरी चिंचवड शहराच्या विकासावरून दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार आरोप प्रत्यारोपांच्या फैरी रंगल्या होत्या. मात्र, या निवडणुकीच्या निकालानंतर १५ दिवसातच अजित पवार यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानं हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांनी अजित पवारांचा जुना एक व्हिडीओ देखील पोस्ट केला होता. अजित पवार यांच्या निधनाच्या काही दिवस आधीच त्यांना आपण एकेरी बोललो, याची बोच महेश लांडगे यांना लागून राहिलेली आहे. केवळ ४० सेकंदाच्या भाषणात त्यांनी दादा मला माफ करा म्हणत झालेल्या चुकीची क्षमा मागितली आहे.

## कॉसमॉस बँकेचा स्तुत्य उपक्रम; पहिल्यांदाच ४ अंध व्यक्तींची बँकेत नियुक्ती!

**पुणे । प्रतिनिधी**

१८ जानेवारी २०२६ रोजी कॉसमॉस बँकेने ग्राहक सेवेची १२० वर्ष पूर्ण केली. वर्धापनदिनाच्या निमित्ताने बँकेने एक अतिषय स्तुत्य उपक्रमाची सुरूवात केली. बँकेतर्फे चार अंध व्यक्तींना नियुक्तीची पत्रं बँकेचे अध्यक्ष ॲड. प्रल्हाद कोकरे यांच्या हस्ते तसेच समारंभाचे प्रमुख पाहुणे सीए दिलीप सातभाई यांच्या उपस्थितीत देण्यात आली.



देवदान गायकवाड, अभिजित मोरे, पूजा घाडगे व प्रज्वल बिरे या अंध व्यक्तींची बँकेने ट्रेनी ज्युनिअर ऑफिसर म्हणून नेमणूक केली. एमएस वर्ड, एक्सेल चाचणी तसेच मुलाखतीद्वारे या सर्वांची निवड करण्यात आली. बँक ऑफिस तसेच मुख्य कार्यालयात या व्यक्तींना योग्य ते काम देण्यात येणार असून सर्व आवश्यक सुविधा व सॉटवेअर सपोर्ट देण्यात येणार आहे. सामाजिक जाणीवेच्या जबाबदारीने कॉसमॉस बँकेने हे महत्वाचे पाऊल उचलले असून सहकारी बँकींग क्षेत्रात एक चांगला पायंडा यानिमित्ताने पाडला आहे. बँकेच्या १२० वर्शाच्या कार्यकाळात पहिल्यांदाच अंध व्यक्तींना अशी नियुक्तीपत्रे देण्यात आली आहेत. बँकेच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सीए मिलिंद काळे यांच्या कल्पनेतून हा उपक्रम बँकेने सुरू केला आहे. सदर उपक्रमाची माहिती देताना सीए काळे यांनी सांगितले की, दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणून स्वत:च्या पायावर उभं रहाण्याची संधी या निमित्ताने बँकेने उपलब्ध करून दिली आहे. भविश्यातही अशाच प्रकारचे उपक्रम राबविले जातील. सहकारी बँकींग क्षेत्रात कॉसमॉस ही बहुधा पहिलीच सहकारी बँक असेल, ज्यांनी अंध व्यक्तींना सेवेत सामावून घेतले आहे.

## पानटपरी चालवायची असेल, ५०० रुपये हप्ता दे! पिंपरीमध्ये तडीपार गुंडांचा त्रास

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरीमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका तडीपार गुंडाकडून होत असलेल्या सततच्या त्रासामुळे एका टपरी चालक महिलेने आत्मदहनाचा प्रयत्न केला. महिलेने गुरुवारी (दि २९) पोलिस आयुक्त कार्यालयासमोर अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने मोठी खळबळ उडाली. या प्रकरणी महिलेवर चिंचवडमध्ये, तर तिला त्रास देणाऱ्या गुंडावर एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिता सागर लांडगे (वय ५०, लांडेवाडी, भोसरी) असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या महिलेचे नाव आहे. या महिलेच्या विरोधात



पोलिस अंमलदार मोनिका जरे यांनी चिंचवड पोलिस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे, तर तया महिलेला त्रास देणाऱ्या सचिन डॅनियल खलसे (४०, लांडेवाडी, भोसरी) याला पोलिसांनी अटक केली आहे.

आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या अनिता लांडगे यांची लांडेवाडी येथे ममता नावाची पानटपरी आहे. खलसे हा टपरीवर आला. त्याने टपरीतून घेतलेल्या सिगारेट, पाण्याच्या बाटलीचे लांडगे यांनी पैसे मागितले असता तो चिडून गेला. 'तुला जर पानटपरी चालवायची असेल, तर प्रत्येक महिन्याला ५०० रुपये हप्ता द्यावा लागेल, नाहीतर तुझी टपरी जाळून टाकीन आणि तुला मारून टाकीन,' अशी धमकी दिली. याबाबत अनिता लांडगे यांनी एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांच्या कारवाई केल्यानंतरही तो महिलेला त्रास देत होता. गुरुवारी सकाळी महिला पोलिस आयुक्त कार्यालयासमोर ती महिला आली. तिने सोबत ज्वलनशील पदार्थ असलेली बाटली आणली होती. पोलिसांनी आत्महत्या करण्यापासून परावृत्त केले. त्यानंतरही तिने ज्वलनशील पदार्थ स्वतःच्या अंगावर ओतून घेत, आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली होती.तर याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गणेश जामदार यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला आणि संशयिताचे पूर्वीपासूनच वाद आहेत. महिलेच्या तक्रारीनुसार आम्ही खलसेवर प्राथमिक कारवाई केली होती. खलसेने पुन्हा त्रास दिल्याबाबत फिर्यादीने कोणतीही तक्रार दिली नाही. त्यांनी थेट आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे समजले. मात्र, त्यांनी नव्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, खलसेवर खंडणीचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

## युपीएससी'मध्ये नीतिशास्त्र विषय आणल्यानंतर टीका झाली: आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. डी. पी. अग्रवाल

**पुणे । प्रतिनिधी**

देशातील सर्वांत मोठ्या व तितक्याच महत्त्वाच्या केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (युपीएससी) घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षांच्या अभ्यासक्रमामध्ये मी अध्यक्ष असताना अनेक बदल घडवावे लागले. मात्र, जेव्हा या परीक्षेमध्ये नीतिशास्त्र या विषयाचा अंतर्भाव करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यावर चौफेर टीका झाली. तथापि, तत्कालीन सरकार व मंत्रालयाने आयोगावर ठाम विश्वास व्यक्त केल्याने या बदलांची प्रभावी अंमलबजावणी झाली. कालांतराने नीतिशास्त्राचे महत्त्व सर्वांना पटले, असे मत केंद्रीय लोकसेवा आयोगाचे (युपीएससी) माजी अध्यक्ष डॉ. डी. पी. अग्रवाल यांनी व्यक्त केले.

ते एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे येथील स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस (एसआयसीएस) तर्फे नागरी सेवांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित नागरी सेवा आणि राष्ट्रनिर्मिती या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत बोलत होते. याप्रसंगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.



किशोर राजे निंबाळकर, विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, प्रोव्होस्ट डॉ. सायली गणकर, प्र-कुलपती डॉ. मोहित दुबे, स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसचे संचालक डॉ. सुजित धर्मपात्रे, स्कूल ऑफ लॉचे अधिष्ठाता डॉ. गोविंद राजपाल आदी उपस्थित होते.पुढे बोलताना डॉ. अग्रवाल म्हणाले की, नागरी सेवा परीक्षांमध्ये नीतिशास्त्राचा अंतर्भाव करण्यापूर्वी तो विषय माहिती तंत्रज्ञान व व्यवस्थापन संस्था (आयआयटीएम), ग्वाल्हेर येथे समाविष्ट करण्यात आला होता. कोणालाही त्रास न देता गोष्टी प्रभावीपणे घडवून आणण्याचे कार्य नीतिशास्त्र करते.

नीतिमूल्ये पाळल्यामुळे जगात शांतता प्रस्थापित होते. त्यामुळे देशाचा कणा असणाऱ्या भावी प्रशासकांमध्ये नीतिमूल्ये असायलाच हवीत, असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच, सर्वच जण सनदी अधिकारी होऊ शकत नाहीत; युपीएससी व एमपीएससी व्यतिरिक्तही समाजात विधायक बदल घडवून राष्ट्रनिर्मितीत हातभार लावता येतो, असेही त्यांनी नमूद केले. याप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. मंगेश कराड म्हणाले की, भारताला विकसित करण्याची जबाबदारी केवळ सरकार किंवा अधिकाऱ्यांची नाही. प्रत्येक नागरिकाला नागरी जबाबदारीची जाणीव होणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात पूर्ण क्षमतेने, प्रामाणिकपणे व नियमांचे पालन करून काम केल्यास २०४७ पर्यंत भारत विकसित होऊन जगात महासत्ता बनेल. कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर दुपारच्या सत्रात डॉ. पल्लवी दराडे (आयआरएस), प्रदीप कुमार यादव (आयपीएस) तसेच पुण्याच्या कर आयुक्त वैशाली पतंगे (आयआरएस) यांनी स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रोव्होस्ट डॉ. गणकर यांनी केले, तर आभार डॉ. धर्मपात्रे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहा वाघटकर यांनी केले.

## जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ३,६९३ ईव्हीएम मशिन सज्ज

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या गट आणि गणांसाठी उमेदवारांची निश्चिती झाल्यानंतर आता जिल्हा प्रशासनाने मतदान यंत्र आणि कंट्रोल युनिटची संख्या अंतिम केली आहे. त्यानुसार आता ३ हजार ६९३ मतदान यंत्रे तर ३६०५ कंट्रोल युनिट मतदान केंद्रावर वापरण्यात येणार आहेत. तर १४६ पैकी केवळ तीन गणांमध्ये दोन मतदान यंत्रांची गरज भासणार आहे.जिल्हा परिषद निवडणुकीसाठी अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतर आता लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्यानुसार जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ७३ गटांमध्ये २९९ उमेदवार आता रिंगणात उरले असून, पंचायत समितीच्या १४६ गणांसाठी ५२८ उमेदवारांमध्ये लढत रंगणार आहे. अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवसापर्यंत पंचायत समितीसाठी ७२९ तर जिल्हा परिषदेसाठी




४२८ जणांनी माघार घेतल्याने आता मतदान यंत्र आणि कंट्रोल युनिटची संख्याही अंतिम करण्यात आली आहे. महापालिका निवडणुकीत मतदान यंत्र आणि कंट्रोल युनिट बंद पडण्याच्या हजारांहून अधिक तक्रारी आल्यानंतर जिल्हा परिषद निवडणुकीसाठी एकूण १४ हजार ३३८ मतदान यंत्रांची उपलब्धता करून दिली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार ही उपलब्धता आता दुपटीऐवजी चारपट केली आहे. उमेदवारांची संख्या वाढल्याने बारामती, मुळशी आणि इंदापूर तालुक्यांतील प्रत्येकी एका गणात दोन मतदान यंत्रांची गरज भासणार आहे. त्यात मुळशी तालुक्यातील हिंजवडी गटातील माण गण, बारामती तालुक्यातील पणदरे गटातील पणदरे गण इंदापूर तालुक्यातील लासुर्णे गटातील सणसर गणाचा समावेश आहे. त्यानुसार मुळशी तालुक्यात २२७ मतदान केंद्रांवर २६२ मतदान यंत्रे बसविली जाणार आहेत. बारामती तालुक्यातील २९९ मतदान केंद्रांवर ३२४ मतदान यंत्रे तर इंदापूर तालुक्यातील ४०० मतदान केंद्रांवर ४२८ मतदान यंत्रे बसविली जाणार आहेत. अन्य तालुक्यांत मतदान केंद्रांच्या संख्येइतकीच मतदान यंत्रे आणि कंट्रोल युनिट वापरण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

## दुर्दैवी! पिकअपच्या चाकाखाली सापडून दोन वर्षांच्या बालकाचा मृत्यू; पोलिसांनी चालकाला घेतलं ताब्यात


**खराडी । प्रतिनिधी**

वाहनाच्या चाकाखाली सापडून दोन वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाल्याची घटना खराडी परिसरात घडली. या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मयूर अमर माळवे (वय २) असे मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. या प्रकरणी पिकअप वाहन चालक राजू मगन ढोले (६६, रा. बाळकृष्ण अपार्टमेंट, ढोले-पाटील रस्ता) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पूनम अमर माळवे (२५, रा. ढोले पाटील वाडा, खराडी ) यांनी खराडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पूनम माळवे यांचा दोन वर्षांचा मुलगा गुरुवारी (२९ जानेवारी) सायंकाळी सातच्या सुमारास घरासमोरील मोकळ्या जागेत खेळत होता. मोकळ्या जागेत ढोले यांचा गोठा आहे. दूध वाहतूक करणारे पिकअप वाहन घेऊन ढोले तेथे आले होते. त्यावेळी मोकळ्या जागेत खेळणारा मयूर वाहनाच्या चाकाखाली सापडल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे यांनी घटनास्थळी भेट दिली. पिकअप वाहनचालक ढोले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक गोडसे तपास करीत आहेत.

## ८७ वर्षीय सेवानिवृत्त अधिकाऱ्याला १ कोटी ११ लाखांचा गंडा; केअर टेकरनेच केला घात

**पुणे । प्रतिनिधी**

सेवानिवृत्त ८७ वर्षीय मेजेरच्या धनादेश पुस्तकाची चोरी करून१ कोटी ११ लाख ९३ हजारांचा आर्थिक गंडा घातला असून काम करणाऱ्या केअर टेकरने साथीदाराच्या मदतीने हा प्रकार केला आहे.पेन्शन काढताना खात्यातील पैसे कमी झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर मेजर यांनी बँकेला कळविले होते. एक व्यक्ती धनादेश घेऊन आल्याची माहिती बँकेने पोलिसांना दिली.




त्यानुसार केअर टेकरचा साथीदार सुप्रितसिंग भुपेंद्र कंडारिया (३९,रा. कोथरुड) याला अटक केली असून केअर टेकर राज शहासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी सेवानिवृत्त मेजर बोमन इरुशॉ अमारिया (८७) यांनी फिर्याद दिली असून हा प्रकार मार्च २०२५ ते २८ जानेवारी दरम्यान घडला.बोमन अमारिया यांना मुलबाळ अथवा वारसदार नाही. ते एकटेच असल्याने त्यांनी राज शहा याला केअर टेकर नेमले होते. मात्र तो फरार झाला. त्यावेळी त्याने बोमन यांचे धनादेश पुस्तक लंपास केले. काही काळाने ते वृद्धाश्रमात राहायला गेले. त्यांच्या खात्यात पेन्शन नियमितपणे जमा होत होती. ते वृद्धाश्रमात असताना राज शहा याने सुप्रितसिंग कंडारिया व इतरांच्या मदतीने बँकेतून पैसे काढले. बनावट सही करुन वेळोवेळी १ कोटी ११ लाख ९३ हजार ९०० रुपयांची रक्कम काढली. पैसे कमी झाल्याचे बोमन यांनी बँकेशी संपर्क साधला.

त्यांनी सांगितले की, जर कोणी माझ्या धनादेशाद्वारे पैसे काढण्यास आला तर तुम्ही ही माहिती मला किंवा पोलिसांना द्या. कॅम्प मधील बँक ऑफ इंडियामध्ये सुप्रितसिंग हा पैसे काढण्यासाठी आला. बँकेने लष्कर पोलिसांना ही माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी त्याला पकडले. राज शहा याचा पोलीस शोध घेत आहेत. शहाला बोमन यांच्या बँक खात्याची सर्व माहिती होती. त्याने धनादेशावर बोमन यांच्या सह्या अगोदरच घेऊन ठेवल्या असाव्यात किंवा बनावट सह्या केल्या असाव्यात असा अंदाज आहे.

## पुणे बार असोसिएशनच्या निवडणुकीत ऐनवेळी मोठा बदल! मतदानाची तारीख बदलली

**पुणे । प्रतिनिधी**

वकिलांची शिखर संघटना असलेल्या पुणे बार असोसिएशनच्या वार्षिक निवडणुकीची तारीख बदलली आहे. ६ फेब्रुवारीऐवजी आता ४ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. त्याच दिवशी रात्री मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. प्रताप परदेशी यांनी दिली.जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार होते, तर पुणे बार असोसिएशनची निवडणूक ६ फेब्रुवारी रोजी होणार होती.




मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेतील मृत्यूमुळे ३ दिवस दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद निवडणुकांची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. आता ७ फेब्रुवारी रोजी मतदान होऊन ९ तारखेला मतमोजणी होणार आहे. अनेक वकील ग्रामीण भागातील आहेत. त्यामुळे त्यांना मतदानास जाण्यास त्रास होऊ नये, ते मतदानापासून वंचित राहू नयेत, यासाठी मुंबई उच्च न्यायालाच्या परवानगीने पुणे बार असोसिएशन निवडणुकीच्या दिवसात बदल करण्यात आल्याची माहिती ॲड. परदेशी यांनी दिली. महिला आरक्षण दिल्यानंतर यंदा पहिल्यांदाच निवडणूक होत आहे. अध्यक्ष पदासाठी तिरंगी लढत होणार आहे. उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार आणि हिशोब तपासणीस पदासाठीही मतदान होणार आहे. १५ कार्यकारिणी सदस्यांची यापूर्वीच सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

## टेमघर प्रकल्पग्रस्तांना दिलासा : २६ कोटींच्या वाढीव मोबदल्याचा मार्ग अखेर मोकळा

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या टेमघर प्रकल्पग्रास्तांना भूसंपादनासाठीचा वाढीव मोबदला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार जलसंपदा विभागाने यासाठी ३९ प्रकरणांमधील शेतकऱ्यांना २६ कोटी १४ लाख रुपयांचा निधी कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे जमा केला आहे. पुढील काही दिवसांत हा निधी न्यायालयात जमा करण्यात येणार आहे. त्यानंतर तो शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार असल्याची माहिती जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.



जिल्हा सत्र न्यायालयाने अडीच वर्षांपूर्वी टेमघर प्रकल्पग्रास्तांसाठी वाढीव मोबदला देण्याचे आदेश दिला होता. मात्र, त्यानंतरही संबंधित शेतकऱ्यांना तो देण्यात आला नव्हता. त्यानंतर न्यायालयाने भूसंपादन कार्यालयातील खुर्ची जप्तीचे दोन वेळा आदेश दिले होते. गेल्या आठवड्यात शेतकरी आणि न्यायालयाच्या बेलिफ यांनी जिल्हा प्रशासनाच्या भूसंपादन अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील खुर्चीच्या जप्तीची कारवाई करण्याबाबत आग्राह धरला होता. त्यानंतर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी तसेच भूसंपादन समन्वयक डॉ. कल्याण पांढरे यांनी कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत धुमाळ यांच्याशी चर्चा केली होती. धुमाळ यांनी तत्काळ अतिरिक्त मुख्य सचिवांशी बोलून यात मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. त्याला प्रतिसाद देत सचिवांनी पुढील आठ दिवसांत हा वाढीव मोबदला देण्याचे देण्याचे मान्य केले होते. त्यानुसार जलसंपदा विभागाने ३९ भूसंपादन प्रकरणांमधील शेतकऱ्यांना २६ कोटी १४ लाख ९४ हजार ८८० रुपयांचा निधी महामंडळाकडे जमा केला आहे. हा निधी आता न्यायालयाच्या निर्देशांनुसार तेथेच जमा करण्यात येईल. पुढील काही दिवसात ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून त्यानंतर हा निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे. जिल्हा सत्र न्यायालयाने टेमघर धरणग्रास्तांना वाढीव मोबदला देण्याचे आदेश देऊन दोन वर्षे उलटली. मात्र, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने मोबदला न दिल्याने न्यायालयाने विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांच्या मालमत्ता जप्तीच्या कारवाईचे आदेश गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये दिले होते. त्यावेळी जिल्हा प्रशासनाने जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांशी चर्चा करून पुढील दोन महिन्यांत अर्थात ऑक्टोबरमध्ये हा मोबदला न्यायालयात जमा करून शेतकऱ्यांना देण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले होते.

## अजित पवारांच्या निधनानंतर पुण्याचे पालकमंत्रिपद कोणाकडे? भाजप-राष्ट्रवादीत नव्या चर्चांना उधाण

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राजकीय दृष्ट्या अनेक प्रश्न निर्माण झाले असतानाच आता आगामी काळात पुण्याचे पालकमंत्रिपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे कायम राहणार की भाजपकडे जाणार, असाही प्रश्न उपस्थित झाला आहे. पालकमंत्रिपद भाजपकडे असावे, अशी इच्छा भाजपच्या पुण्यातील नेत्यांची होती. त्यामुळे आता भाजप याबाबत नेमकी काय भूमिका घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

राज्यात महायुतीत सहभागी झाल्यानंतर पुण्याचे पालकमंत्रिपद चंद्रकांत पाटील यांच्याकडे देण्यात आले होते. किंबहुना तशा अटीवरच अजित पवार त्या वेळेस महायुतीत सहभागी झाले होते. मात्र, भाजपचे सर्वाधिक नऊ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आठ आमदार असतानाही पुण्यासारख्या महत्त्वाच्या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद राष्ट्रवादीकडे गेल्याचे शल्य भाजपच्या स्थानिक नेत्यांना होते. अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे पुण्याचे पालकमंत्रिपद पुन्हा भाजप स्वत:कडे घेणार का, यासंबंधीच्या चर्चांना सुरुवात झाली आहे.